# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### अमरावती व नांदगांव खंडेश्वर (जि.अमरावती) तालुक्यातील महावितरणच्या विविध साहित्याची झालेली चोरी

**(१) ५८२७१ (०३-०५-२०२३). अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती व नांदगांव खंडेश्वर (जि.अमरावती) तालुक्यातील महावितरणच्या वीज वाहिन्यांचे अॅल्युमिनिअम, कॉपर तार, विद्युत रोहीत्रे व त्यामधील ऑईल चोरी झाल्याचे माहे ऑक्टोंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकारांमुळे अनेक विज खांब तुटून शेतांमध्ये, रस्त्यावर व रस्ता शेजारी पडल्यामुळे महावितरणचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या भागातील विज खंडीत झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान होत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं. मर्या., अमरावती यांना दिनांक २८ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०२३) :** (१) हे खरे आहे.

अमरावती व नांदगाव खंडेश्वर (जि. अमरावती) तालुक्यातील महावितरणच्या वीज वाहिन्यांचे अॅल्युमिनिअम, कॉपर तार, विद्युत रोहित्रे व त्यामधील ऑईल चोरी झाल्याच्या घटना माहे एप्रिल २०२२ ते मे २०२३ दरम्यान घडल्या आहेत.

(२) हे खरे आहे.

अमरावती तालुका व नांदगाव खंडेश्वर तालुका येथे महावितरणच्या विज वाहिन्यांचे अॅल्युमिनिअम/कॉपर तार, विद्युत रोहित्र व त्यामधील ऑईल चोरुन नेण्याच्या घटना सतत घडत असल्याने याबाबत पोलीस स्टेशनमध्ये तक्रार (FIR) नोंदविण्यात आलेली आहे.

(३) हे अंशतः खरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि. २५.११.२०२२ रोजी मुख्य अभियंता / अधीक्षक अभियंता अमरावती कार्यालयास सदरील घटनेबाबत योग्य त्या उपाययोजना करण्यासाठी निवेदन दिले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पेनटाकळी (ता.मेहकर, जि.बुलढाणा) प्रकल्पास निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(२) ५८३२५ (३०-०४-२०२३). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेनटाकळी (ता.मेहकर, जि.बुलढाणा) प्रकल्पातील पश्चजलाने बाधित होणाऱ्या घानमोड , मानमोड व पांढरदेव या गावांच्या पुनर्वसनासाठी आणि प्रकल्पातील इतर कामांसाठी सुप्रमा मिळालेली असून पेनटाकळी प्रकल्पाच्या पश्चजलामुळे अंशतः बाधित होणाऱ्या देवदरी गावाच्या पुनर्वसनाचा प्रस्ताव महसूल विभागाकडे कार्यवाहीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे घानमोड, मानमोड या बाधीत गावाच्या पुनर्वसनाकरीता दिनांक २५ जानेवारी, २०२२ रोजी भूखंड वाटपाची कार्यवाही करण्यात आली असून आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी सदर प्रकल्पास आर्थिक तरतूद करण्याचे प्रस्तावित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मान्यता प्राप्त असलेल्या मौजे घानमोड, मानमोड व पांढरदेव गावांकरीता नागरी सुविधा पुरवण्याकरीता अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता मिळविण्याची कार्यवाही प्रगतीत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागरी सुविधा पुरवण्याकरीता अंदाजपत्रकाना प्रशासकीय मान्यता देणे तसेच देवदरी गावाच्या पुनर्वसनाच्या प्रस्तावास मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.
(२) मौजे घानमोड-मानमोड या बाधित गावाच्या पुनर्वसना करीता दि.२५.०१.२०२२ रोजी भुखंड वाटपाची कार्यवाही जिल्हा पुनर्वसन अधिकारी, बुलढाणा यांचेमार्फत पूर्ण करण्यात आलेली आहे. आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी सदर प्रकल्पास रु.२०.०० कोटी एवढी तरतुद करण्यात आली आहे.
(३) हे खरे नाही,
मौजे घानमोड-मानमोड व पांढरदेव या गावाकरीता नागरी सुविधा पुरविण्याकरीता अंदाजपत्रकांना सक्षम स्तरावर प्रशासकिय मान्यता घेवुन निवीदा प्रक्रिया राबवुन कंत्राटदारास कार्यारंभ आदेश देण्यात आलेले असुन सद्यस्थितीत नागरी सुविधांचे कामे प्रगतीपथावर आहेत.
(४) मौजे घानमोड, मानमोड व पांढरदेव या गावाकरीता नागरी सुविधा पुरविण्याचे कामास कार्यारंभ आदेश देण्यात येवुन सद्यस्थितीत नागरी सुविधांचे कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच बाधीत मौजे.देवदरी गावाच्या पुनर्वसनाच्या प्रस्तावावरील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## घुग्घुस (जि.चंद्रपूर) येथील जड वाहनांच्या वाहतूकीला निर्बंध घालण्याबाबत

**(३) ५८३४६ (२६-०४-२०२३). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घुग्घुस (जि.चंद्रपूर) येथील वाहतूकीला निर्बंध असलेल्या रस्त्यांवर जड वाहनांची वर्दळ होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार जड वाहनांची वर्दळ रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०९-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) सदर ठिकाणी जड वाहनांची वर्दळ रोखण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.
• चंद्रपूर जिल्ह्यातील घुग्घुस - वणी रस्त्यावरील रेल्वेब्रिजचे काम सुरू असल्याने घुग्घुस शहरातून जाणाऱ्या जड वाहनांच्या वाहतुकीमुळे वाहतूक समस्या निर्माण होऊन रहदारीला अडथळा निर्माण होऊ नये तसेच जनतेस त्रास, गैरसोय, अपघात होऊन जिवीत किंवा वित्तहानी होऊ नये, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये याकरीता पोलीस

अधीक्षक, चंद्रपूर यांचेकडून दि.०२.११.२०२२ अन्वये मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ च्या कलम ३३ (१) नुसार प्रथमत: दि.१७.१०.२०२२ ते दि.१६.०१.२०२३ पर्यंत व तद्नंतर सुधारित आदेशान्वये दि.१५.११.२०२२ ते दि.१४.०२.२०२३ पर्यंत बंद करण्यात आला होता. सद्यस्थितीत दि.३१.१०.२०२३ पर्यंत सदर रस्ता पूर्णपणे बंद करून पर्यायी मार्ग सुरू करण्यात आले आहेत.

- उपरोक्त आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर भा.द.वि. कलम १८८ अन्वये ०९ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
- वाहतूक नियंत्रण कक्षाकडील इंटरसेप्टर वाहनाद्वारे वेळोवेळी सदर ठिकाणी तपासणी करण्यात येत आहे.
- सदर ठिकाणी ४ वाहतूक पोलीस अंमलदार यांची नियमितपणे नेमणूक करण्यात येत आहे.
- महाराष्ट्र रेल डेव्हलपमेंट कार्पोरेशन लिमिटेड कंपनीचे कर्मचारी पूर्णवेळ बंद असलेल्या रस्त्यावर तैनात करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दर्यापुर व अंजनगाव सुर्जी (जि.अमरावती) या RAPDRP TOWN अंतर्गत उच्च दाब विदयुत वाहिन्या भुमिगत करण्याबाबत

**(४) ५८४४३ (०३-०५-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दर्यापुर व अंजनगाव सुर्जी (जि.अमरावती) या RAPDRP TOWN असलेल्या शहरात दाट वस्ती असून महावितरणाच्या उच्च दाब वाहिन्या या भुमिगत नसल्याने अपघात होत असल्याचे माहे जून, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शहारातील उच्च दाब विदयुत वाहिन्या ह्या भुमिगत करणे तसेच लघु दाब वाहिन्याकरीता ABC केबल वापरणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दर्यापुर व अंजनगाव सुर्जी या RAPDRP TOWN अंतर्गत उच्च दाब विदयुत वाहिन्या भुमिगत करण्याबाबतच्या प्रस्तावास निधीसह मान्यता देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०८-२०२३) :** (१) हे खरे नाही.

दर्यापूर व अंजनगाव ही शहरे अमरावती मंडळातील अचलपूर विभागाअंतर्गत अनुक्रमे दर्यापूर व अंजनगाव उपविभागाअंतर्गत येतात. माहे जुन २०२१ व त्या दरम्यान दर्यापूर शहरात श्रीमती उषा जनकरामजी डोंगरे यांना प्राणांतिक विद्युत अपघात घडला होता. सदर अपघात हा ग्राहकाची सर्व्हीस वायर सदोष असल्यामुळे घडला असे विद्युत निरीक्षक, विद्युत निरीक्षण विभाग, अमरावती यांच्या अभिप्रायानुसार निदर्शनास आले आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

दर्यापूर व अंजनगाव उपविभागाअंतर्गत घरावरुन गेलेल्या विद्युत वाहीन्या अपघात रोखण्यासाठी व स्थानांतरीत करण्यासंदर्भात विविध योजनाअंतर्गत प्रस्तावित केलेली कामे पूर्ण करण्यात आली असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहे. तसेच RDSS योजने अंतर्गत अंजनगाव व दर्यापूर उपविभागा अंतर्गत आवश्यकतेनुसार लघुदाब वाहिनी करीता अनुक्रमे ३.५ किमी व १६.८७ किमी ए.बी. केबल प्रस्तावित करण्यात आली आहे.

(३) दर्यापूर व अंजनगाव उपविभागाअंतर्गत घरावरुन गेलेल्या विद्युत वाहीन्या अपघात रोखण्यासाठी व स्थानांतरीत करण्यासंदर्भात, विशेष घटक योजना (DPDC SCP) व जिल्हा सर्व साधारण योजनेअंतर्गत (DPDC NDSI) प्रस्तावित केलेली कामे पुर्ण करण्यात आली असून वर्ष २०२२-२३ ची कामे प्रगतीपथावर आहे. तसेच RDSS योजने अंतर्गत अंजनगाव व दर्यापूर उपविभागाअंतर्गत आवश्यकतेनुसार लघुदाब वाहिनी करीता ए.बी. केबल प्रस्तावित करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तारूगव्हाण उच्च पातळी बंधारा (ता.पाथरी जि.परभणी) या कामास झालेल्या विलंबाबाबत**

**(५) ५८४६२ (३०-०४-२०२३). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारूगव्हाण उच्च पातळी बंधारा (ता.पाथरी, जि.परभणी) या कामास झालेल्या विलंबाची चौकशी करून कंत्राटदारास काळ्या यादीत टाकणे तसेच रद्द केलेल्या दंडाची रक्कम वसूल करणेबाबत लोकप्रतिनिधीने मा. उपमुख्यमंत्री यांना दिनांक २ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने, कंत्राटदारास काळ्या यादीत टाकण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) गोदावरी नदीवरील तारुगव्हाण उच्च पातळी बंधारा ता. पाथरी जि. परभणी या प्रकल्पाचे काम सन २००९ मध्ये मे. पियुष इंन्फ्राटेक प्रा. लि. औरंगाबाद या अभिकरणास देण्यात आलेले आहे. तदनंतर बाभळी धरणाच्या पाणी वापराबाबतच्या आंतरराज्यीय न्यायालयीन प्रकरणामुळे, भु-संपादनातील अडचणीमुळे, पुरेसा निधी वेळेत उपलब्ध न झाल्यामुळे, प्रकल्पस्थळी आसपास पुरेशी वाळू उपलब्ध न झाल्यामुळे इ. अशा विविध अपरिहार्य कारणामुळे मुख्य अभियंता स्तरावरुन सदर कामास वेळोवेळी निविदा शर्तीनुसार मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तथापि कंत्राटदाराची कामाची गती समाधानकारक नसल्यामुळे बंधाऱ्यात पाणीसाठा व सिंचन निर्मितीचे उद्दीष्ट साध्य होत नसल्याने दि. ३०/०६/२०१९ पर्यंत भाववाढ गोठवून कंत्राटदारास प्रतीदिन रु.१०,०००/- इतका दंड आकारण्यात आलेला होता. तदनंतर कंत्राटदाराने कामाची गती वाढवून जुलै-२०२० मध्ये बंधाऱ्यात प्रथम पाणीसाठा करुन सिंचन निर्मिती केल्याने सदर दंड रद्द करण्यात आलेला आहे. कंत्राटदारास सदर कामापोटीची भाववाढ दि. ३०/०६/२०१९ पर्यंत गोठविण्यात आलेली आहे. सदर बंधाऱ्यामध्ये पाणीसाठा व सिंचन निर्मिती झालेली आहे.

(३) सदर चौकशीच्या अनुषंगाने उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे कंत्राटदारास सदर कामापोटीची देय भाववाढ दि.३०/०६/२०१९ पर्यंत गोठविण्यात आलेली आहे. बंधाऱ्यामध्ये जुलै-२०२० मध्ये पाणीसाठा व सिंचन निर्मिती झालेली असल्याने कुठलीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**उस्मानाबाद जिल्हयात अपु-या वीज पुरवठा होत असल्याने पिकांना पाणी मिळत नसल्याबाबत**

**(६) ५८५३६ (३०-०४-२०२३). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयात वीजेच्या समस्या सुरु असल्याने शेतीसाठी मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध असून देखील केवळ अपुऱ्या वीजेमुळे पिकांना पाणी मिळत नसल्याचे माहे जानेवारी,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज वितरणाच्या समस्या सोडविण्याकरिता माहे मार्च ,२०२२ मध्ये प्रशासकिय मंजूरी मिळालेल्या १८ कोटींची कामे अदयापही सुरु झालेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वीज वितरण कंपनीकडून १८ कोटींची कामे प्रलंबित राहण्यामागील कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतक-यांना सुरळित विज पुरवठा होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
वीज भार व्यवस्थापन करण्यासाठी तसेच कृषी पंपांसाठी आवश्यक असलेला विद्युत पुरवठा लक्षात घेऊन मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या निर्देशानुसार उस्मानाबाद जिल्हयासहीत संपूर्ण राज्यात कृषी वाहिन्यांवरील ग्राहकांना रात्रीच्या काळात ८ तास किंवा दिवसा ८ तास थ्री फेज वीजेची उपलब्धता चक्राकार पध्दतीने देण्यात येते. तसेच वीज वाहिनीवरील बिघाड, रोहित्र ना-दुरुस्त होणे, ऊर्जा रोहित्र अतिभारीत असणे इत्यादी कारणांमुळे शेतीपंपांचा वीजपुरवठा खंडीत होत असतो.
(२) हे खरे नाही.
मार्च २०२२ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत रु. १८.३० कोटीचा निधी वितरण आदेश जिल्हा नियोजन समितीकडून प्राप्त झाला असून सदर उपलब्ध निधी नुसार नवीन वीज पुरवठयाच्या कामासाठी ३१ नोंदणीकृत कंत्राटदारांना (NSC Empanelment Agency) कार्यादेश देण्यात आले आहे व सदर कामे प्रगतीपथावर आहेत.
(३) प्रशासकीय मंजूरी मिळालेल्या रु. १८.३० कोटीपैकी उस्मानाबाद मंडळाअंतर्गत एकूण रु. ११.६० कोटीची कामे पूर्ण झालेली असून उर्वरित रु. ६.७० कोटीची कामे प्रगतीपथावर असून माहे जुलै २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.
(४) शेतकऱ्यांना सुरळीत वीज पुरवठा होणाऱ्या दृष्टिने कृषीपंप वीज जोडणी धोरण २०२० अंतर्गत डोंजा, मंगरुळ, बेडगा, आलूर, यसवंडी व ढोकी या ६ उपकेंद्रामध्ये अतिरीक्त ऊर्जा रोहित्र मंजूर करण्यात आले असून सदरचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच, सुधारित वितरण क्षेत्र (RDSS) या योजनेअंतर्गत ३३/११ के.व्ही. नविन उपकेंद्र -२९, अतिरीक्त ऊर्जा रोहित्र-२०, ऊर्जा रोहित्र क्षमतावाढ -०८, उच्चदाब वाहिनी-१४८९ कि.मी., नविन वितरण रोहित्र ९४३, लघुदाब वाहिनी-११७७ कि.मी. व इतर कामे अशी एकूण रु. ६२९.२० कोटीची कामे मंजूर करण्यात आलेली आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वेणी ( ता.महागांव,जि.यवतमाळ) येथील धरण सिंचन प्रकल्पांचे मायनर कार्यान्वित करण्याबाबत**

**(७) ५८७६९ (२१-०४-२०२३). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वेणी ( ता.महागांव,जि.यवतमाळ) येथे धरण सिंचन प्रकल्पांचे ५० किलोमीटर टेलपर्यंत पाणी अद्यापही गेले नसल्यामुळे मागील चार वर्षापासून मायनर बंद असल्याने पाचशे हेक्टरवरील सिंचनाचे प्रश्न निर्माण झाल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०९-२०२३) :** (१) हे खरे आहे.
वेणी, ता. महागाव, जि. यवतमाळ येथील अधरपुस प्रकल्पाच्या डावा मुख्य कालव्याची एकुण लांबी ४९.५० किमी व पुच्छ वितरीकेची लांबी १२.५० कि मी आहे. कालव्याच्या किमी ४८ मधील निरीक्षण पथाचा भराव वाहुन गेल्यामुळे किमी ४८ च्या पुढील लाभक्षेत्रास पाणी देणे शक्य झालेले नाही. तथापि, किमी ४८ च्या पुढील लाभक्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात विहीरींची व विंधन विहिरींची संख्या जास्त असल्याने लाभधारक पाण्याची मागणी करीत नाही.
(२) किमी ४८ मधील निरीक्षण पथाच्या भरावाच्या दुरुस्तीचे कामाचा समावेश सन २०२३-२४ च्या प्रापणसूचीत करणे नियोजीत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जव्हार ( जि. ठाणे ) येथील आदिवासी ग्रामीण भागातील विकासासाठी तथा रोजगारासाठी आलेल्या निधीत झालेला गैरव्यवहार**

**(८) ५८७८१ (०३-०५-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि. ठाणे) येथील आदिवासी अतिदुर्गम ग्रामीण भागातील गरीब शेतकरी, लाभार्थी, मजूर यांच्या विकासासाठी तथा रोजगारासाठी प्राप्त झालेल्या निधीत गैरव्यवहार झाल्याप्रकरणी माहे मार्च, २०१९ च्या पत्रान्वये स्थापन केलेल्या त्रिसदस्यीय समितीने अहवाल माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अहवालाच्या अनुषंगाने किती कोटीचा अपहार करण्यात आला आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन अहवालाच्या अनुषंगाने अपहार करणाऱ्या संबधित दोषीवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०२३) :**(१) होय.

महसुल व वन विभाग यांचे कडुन शासन निर्णय क्रमांक सावनि-२०१९/ प्र.क्र. ४२/ फ-११ दि. ०३.०५.२०१९ अन्वये नेमण्यात आलेल्या त्रिसदस्यीय समितीचा अहवाल अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मुख्यालय) सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत दि. २९.०७.२०२२ च्या पत्रान्वये सादर केलेला आहे.

(२) प्रस्तुत अहवालात रु. ७८.१४ कोटी एवढ्या रक्कमेचा अपहार करण्यात आला असल्याचे नमूद आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणांची चौकशी प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) नागपुर यांचे नियंत्रणाखाली करण्यात आली असून एकुण १० अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द दिनांक १२/१०/२०२२ रोजी जव्हार पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.न. १९७/२०२२ भा. द. वि. सं. क.१२०(ब), १९६, २१८, ४२०, ४६७, ४६८, ४७१, ४०६, ४०८, ४०९, ३४ सह भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम १३ व अनुसूचित जाती व जमाती (अ.प्र.) अधिनीयम १९८९ चे कलम ३ (२) (५A), कलम ४ (१) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्हयाचा पुढील तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुमरी (ता. शहापूर, जि.ठाणे ) नदीवर उभारण्यात येत असलेल्या धरणाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(९) ५८७८७ (२७-०४-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील मुंबईला पाणी पुरवठा करणा-या भातसा धरणापासून अवघ्या ६ कि.मी. अंतरावरील मुमरी नदीवर उभारण्यात येत असलेल्या धरणाचे काम गेल्या सहा महिन्यापासून चिकट काळी तांबडी माती अभावी प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तसेच सदर धरणाचे काम तातडीने सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) शहापूर तालुक्यातील मुमरी नदीवरील धरणाच्या उर्वरित कामासाठी आवश्यक असणारी गाभा भराव माती बुडीत क्षेत्रात तसेच स्विकृत निविदेतील मंजूर वहन अंतरामध्ये कमी प्रमाणात उपलब्ध होत असल्याने सदर उपलब्ध परिमाणातच धरणाचे काम पुन:श्च सुरु करण्यासाठी मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांच्या सहाय्याने विविध तांत्रिक पर्यायांचा अभ्यास करण्यात येत आहे. त्यानुसार मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांच्याकडून प्राप्त होणारा

सुयोग्य पर्याय विचारात घेऊन धरणाचे काम सन २०२५ अखेर पूर्ण करण्याचे नियोजित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### गंगापूर धरण प्रकल्पाचा नाशिक डावा कालवा बंदिस्त पाईपलाईनव्दारे प्रवाहित करण्याबाबत

**(१०) ५८८६६ (०२-०५-२०२३). ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिका हद्दीतील गंगापूर धरण प्रकल्पाचा नाशिक डावा कालवा एकूण कालवा लांबी ५१.५४० किमी पैकी कि.मी ७.००/०० ते कि.मी २५.००/०० इतका लांबीचा अंदाजे १८ कि.मी नाशिक शहरातून खुल्या स्वरूपाने प्रवाहित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदरील कालवा खुल्या स्वरूपाने नाशिक मनपा हद्दीतून प्रवाहित असल्याने त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर प्लास्टिकचा कचरा/घाण/ सांडपाणी इत्यादी टाकला जात असल्याने कालव्यात जात शहरानजीकच्या १० गावाना अशुध्द पिण्याच्या पाण्याच्या पुरवठा होवून तेथील नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे तसेच येत असून शहरातून प्रवाहित होत असल्याने कालव्यालगत झोपडपट्टीतील लहान मुले व अनेक नागरिक आवर्तना दरम्यान कालव्यात बुडून मरण पावल्याच्या अनेक घटना घडल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लोकप्रतिनिधीनी दिनांक १२ जानेवारी, २०२० व दिनांक २३ ऑगस्ट, २०२२ रोजी प्रधान सचिव (ला.भ.क्षे ) जलसंपदा विभाग महाराष्ट्र शासन यांच्याकडे तसेच वेळोवेळी अधिक्षक अभियंता जलसंपदा विभाग नाशिक यांच्याकडे लोकप्रतिनिधी सह अनेक नागरिकांनी सदरील खुला प्रवाहीत कालवा थेट बंदिस्त पाईपव्दारे प्रवाहित करण्यासाठी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास नाशिक मनपा हद्दीतील १८ कि.मी कालवा थेट बंदिस्त पाईपव्दारे प्रवाहित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०९-२०२३) :** (१) होय,

(२) कालव्यात मनपा हद्दीत मोठ्या प्रमाणावर प्लास्टिकचा कचरा/घाण/सांडपाणी,इ.टाकले जाते.त्यामुळे आवर्तन काळात कालवा फुटीचा धोका नेहमी उद्भवतो.तसेच कालव्यावर १० गावांचा पाणी पुरवठा अवलंबुन आहे.त्यामुळे तेथील लोकांचे आरोग्यही धोक्यात येण्याची शक्यता आहे.तसेच कालव्यालगत असलेल्या झोपडपट्टीतील लहान मुले/जनावरे आवर्तनादरम्यान कालव्यात पडल्यास बुडून जिवीतहानी होण्याची शक्यता आहे.

(३) होय, हे अंशत: खरे आहे, लोकप्रतिनिधीनी दि.२३/८/२०२२ रोजीच्या पत्रान्वये अशी मागणी केली आहे.

(४) नाशिक महानगर पालिका हद्दीत गंगापुर प्रकल्पाचा नाशिक डावा तट कालवा कि.मी. ७ ते २३ आर.सी.सी. बॉक्स कॅनालद्वारे बंदीस्त करणेबाबतच्या कामास तत्वत: मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव महामंडळ कार्यालयाचे पत्र,दि.११/१०/२०२२ अन्वये प्राप्त असून त्यानुषंगाने नलिकेद्वारे वितरण प्रणाली धोरणाबाबतच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये आवश्यक बदल/सुधारणा करणेच्या दृष्टीने सर्वंकष अहवाल सादर करणेबाबत दि.१२/०६/२०२३ रोजीच्या पत्राद्वारे महासंचालक,मेरी,नाशिक यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील वीज बिल थकबाकी असणा-या ग्राहकांकरीता महावितरणची विलासराव देशमुख अभय योजना राबविण्याबाबत

**(११) ५८९१४ (२६-०४-२०२३). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील वीज बिल थकबाकी असणा-या ग्राहकांकरीता महावितरणची विलासराव देशमुख अभय योजना दिनांक ३१ डिसेंबर, २०२२ पर्यत कार्यान्वित होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेकरीता तालुक्यातील ४ हजार ८२ लाभार्थी पात्र असून त्यापैकी केवळ ३९७ ग्राहकांनी या योजनेचा लाभ घेतल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, तालुक्यातील केवळ ३९७ ग्राहकांनाच या योजनेचा लाभ मिळल्याने हजारो वीज ग्राहक या योजनेपासून वंचित राहीले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्याअनुषंगाने योजनेचा लाभ तालुक्यातील लाभार्थी ग्राहकांना मिळण्याकरीता कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०२३) :** (१) हे खरे आहे.
महावितरणव्दारे विलासराव देशमुख अभय योजना ही मार्च २०२२ ते ऑगस्ट २०२२ या कालावधीमध्ये लागू करण्यात आली होती. तद्नंतर सदर योजनेचा कालावधी डिसेंबर २०२२ पर्यंत वाढविण्यात आलेला होता.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) व (४) हे अंशत: खरे आहे.
जव्हार तालुक्यात एकूण ४०८२ कायमस्वरुपी वीज पूरवठा खंडीत ग्राहक सदर योजनेत लाभ घेण्यास पात्र होते. पैकी ४११ वीजग्राहकांनी दि. २४.०५.२०२३ पर्यंत लाभ घेतलेला आहे. जास्तीत जास्त ग्राहकांना सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी आवाहन करण्यात आले होते व त्यासाठी सूचना फलक व लोक प्रतिनिधीव्दारे योजनेची माहिती जास्तीत जास्त ग्राहकांपर्यंत पोहचविण्यात आली होती. तसेच जास्त ग्राहकांना सदर योजनेचा लाभ होण्यासाठी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीव्दारे सदर योजनेचा कालावधी ऑगस्ट २०२२ पासून डिसेंबर २०२२ पर्यंत वाढविण्यात आला होता.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महावितरणची थकबाकी रक्कम वसूल करण्याच्यादृष्टीने उपाययोजना करण्याबाबत

**(१२) ५९००१ (०८-०५-२०२३). श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.पी.एन.पाटील (सडोलीकर) (करवीर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात महावितरणचे जवळपास २ कोटी ७० लाख वीज ग्राहक असून त्यांच्याकडे सुमारे ६५ हजार कोटी रुपयाची थकबाकी असल्याचे दिनांक १८ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू वीज बिलाची थकीत रक्कम वसूल करण्यासाठी शासनाने ३६२७ कोटी रुपयांचे व्याज व ५५ कोटी रुपये दंडाची रक्कम माफ करुन एक रक्कमी कर्ज फेडण्याच्या प्रस्तावास मंजूरी दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रस्तावामुळे शासनास एकूण हजार कोटी रुपये निधीचे आर्थिक नुकसान सहन करावे लागत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने वन टाईम सेटलमेंटच्या योजने अंतर्गत अद्यापपर्यंत एकूण किती रुपेय थकबाकीची रक्कम वसूल केलेली आहे, व अद्याप किती रुपये वसुलीची रक्कम येणे बाकी आहे, असल्यास शासनाने रक्कम वसुली करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०८-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे. ग्रामविकास विभाग व नगरविकास विभाग यांच्या अखत्यारित असलेले सार्वजनिक पाणी पुरवठा व पथदिव्यांची थकबाकी अदा करण्याकरिता OTS योजना दि. ०९.०१.२०२३ रोजी मंजूर करण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) वन टाईम सेटलमेंटच्या योजने अंतर्गत ग्रामविकास विभागाच्या पथदिव्यांची माहे मे २०२२ पर्यंतच्या एकूण थकबाकी रु. ६०३७ कोटी पैकी मूळ थकबाकीची रक्कम रु. ३३०१ कोटी प्राप्त झाली आहे व OTS योजने प्रमाणे माहे मे-२०२२ पर्यंत सार्वजनिक पाणीपुरवठयाची मूळ थकबाकीची रक्कम तसेच "क" वर्ग नगरपरिषद व नगरपंचायती यांच्या अखत्यारितील पथदिवे व सार्वजनिक पाणीपुरवठा योजनाच्या थकबाकीपोटी कोणतीही रक्कम महावितरणला संबंधित विभागामार्फत अर्थसंकल्पिय तरतूद करून अदा करण्याची कार्यवाही नियोजित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## १.वैभववाडी ( जि.सिंधुदुर्ग ) तालुक्यातील नाधवडे येथे कालव्याचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१३) ५९०३२ (०२-०५-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैभववाडी ( जि.सिंधुदुर्ग ) तालुक्यातील नाधवडे धरणाची पहिल्या टप्प्यातील घळभरणी होऊन जवळपास १८ वर्षे होऊनही कालव्याअभावी एक गुंठाही जमीन सिंचनाखाली आलेली नसल्याचे माहे डिसेंबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कालव्याअभावी जमीन सिंचनाखाली येत नसल्याने धरणाच्या लाभक्षेत्रात येणा-या नाधवडे गावातील रहिवाशांना धरण असूनही शेतीसाठी आणि पिण्याचे पाणी मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त धरणाची उंची वाढविणे व अन्य कामांसाठी शासनाने प्रशासकिय मान्यता देऊन कोटीचा निधी मंजूर करुनही जमीन सिंचनाखाली न येण्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले, त्यानुषंगाने जमीन सिंचनासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ,

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

नाधवडे ल.पा. प्रकल्प, ता. वैभववाडी, जि. सिंधुदुर्ग या प्रकल्पास पुन: प्रशासकीय मान्यता १९९५-९६ मध्ये मिळाली असून त्यानुसार धरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. सन २००४ पासून धरणामध्ये ४.४४ द.ल.घ.मी. पाणीसाठा होत आहे. कालव्याची कामे अपूर्ण असल्याने सिंचनासाठी कालव्यामधून पाणीवापर होत नाही. तसेच सुप्रमा मान्यतेपेक्षा जास्त खर्च झाला असल्यामुळे सन २०१३ -१४ पासून प्रकल्पाची कामे सुप्रमा अभावी तसेच निधी अभावी प्रकल्पाची कामे रखडलेली होती. मान्यता प्राप्त प्रथम सुप्रमा मध्ये पारंपारिक कालव्याने सिंचन प्रस्तावीत होते व त्यानुसार कालव्याकरीता भूसंपादन प्रस्ताव प्रगतीत होते. परंतू द्वितीय सुप्रमा प्रस्तावात शासन धोरणानुसार पारंपारिक कालव्या ऐवजी बंदिस्त नलिका प्रणालीद्वारे सिंचन प्रस्तावीत केलेले आहे. सद्यस्थितीत नाधवडे ल.पा. प्रकल्पाच्या रु.१०७९८.८ लक्ष किंमतीच्या द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावास शासनाने दि.०९ मार्च २०२३ रोजी मान्यता दिली असून निधी उपलब्धतेनुसार नलिका वितरण प्रणालीव्दारे लाभक्षेत्रामध्ये ४९८ हे. क्षेत्रास सिंचनाचे लाभ देणे प्रस्तावीत आहे.

(२) अंशत: खरे आहे.

तथापी सन २०१४-१५ पासून धरणाच्या लाभक्षेत्रात येणा-या नाधवडे येथील शेतकऱ्यांच्या मागणीनुसार सिंचनासाठी पाणी धरणातून नदीमध्ये सोडण्यात येऊन उपसा सिंचना द्वारे सिंचन होत आहे. सदर प्रकल्पांतर्गत सन २०१४-१५ मध्ये ३४ हे., २०१५-१६ मध्ये ३० हे., २०१६-१७ मध्ये ३७ हे., २०१७-१८ मध्ये ४५ हे., २०१८-१९ मध्ये ९६ हे., २०१९-२० मध्ये २० हे. व २०२०-२१ मध्ये ५३ हे. इतक्या सिंचनक्षेत्रास पाणी देणेत आले आहे. सदर सुधारीत प्रशासकीय मान्यता व प्रचलीत बंदिस्त नलिका वितरण प्रणाली धोरणानुसार पारंपारिक कालव्या ऐवजी बंदिस्त नलिका वितरण प्रणालीद्वारे लाभक्षेत्रामध्ये नाधवडे (३८९ हे.) व सरदारवाडी (१०९ हे.) असे एकूण ४९८ हे. क्षेत्रास सिंचनाचे लाभ देणे प्रस्तावीत आहे.

(३) शासनाने नाधवडे ल.पा. प्रकल्पाच्या रु.१०७९८.७८ लक्ष किंमतीच्या द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावास दि.०९ मार्च २०२३ रोजी मान्यता दिली आहे.
सद्यस्थितीत द्वितीय सुप्रमा प्रस्तावात शासन धोरणानुसार पारंपारिक कालव्या ऐवजी बंदिस्त नलिका प्रणालीद्वारे सिंचन प्रस्तावीत असून बंदिस्त नलिका वितरण प्रणालीने करावयाच्या दृष्टीने आवश्यक सर्वेक्षण करुन निधी उपलब्धतेनुसार बंदिस्त नलिका वितरण प्रणालीचे काम पूर्ण करुन सिंचनासाठी शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध करुन देण्याचे नियोजन आहे. त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुंडल (ता. पलूस ,जि.सांगली) येथील गुहागर- विजापूर महामार्गावर झालेल्या अपघातातील ट्रक्टर ८ दिवस घटनास्थळीच असल्याबाबत**

**(१४) ५९०८२ (३०-०४-२०२३). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुंडल (ता. पलूस, जि.सांगली) येथील गुहागर- विजापूर महामार्गावर झालेल्या अपघातातील ट्रक्टर ८ दिवस प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे घटनास्थळीच असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या ट्रक्टर मुळे येथे आणखी अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन या प्रकरणातील दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०९-२०२३) :** (१) दि.२५.१२.२०२२ रोजी कराड-तासगाव रोडवर ट्रॅक्टरचा अपघात झाला. अपघातात ट्रॅक्टरचे पुढील बाजूचे डावे चाक व पाठीमागील बाजूचे उजवे चाक मोडल्याने दुरूस्ती केल्याशिवाय ट्रॅक्टर जागेवरून हलविणे शक्य नव्हते.
(२) सदर अपघातग्रस्त ट्रॅक्टर हा रोडच्या साईडपट्टीच्या बाजूला असल्याने रस्ता पुर्णपणे वाहतुकीसाठी खुला होता. अपघातग्रस्त ट्रॅक्टरच्या ठिकाणी दुसरा अपघात होणार नाही, याची दक्षता घेण्यात आली होती.
(३) सदर अपघाताच्या अनुषंगाने कुंडल पोलीस ठाणे येथे ट्रॅक्टर चालकाविरुध्द गु.र.नं.१५५/२०२२ भा.द.वि.सं. कलम ३०४(अ), २७९, ३३७, ३३८ मो.वा.का.कलम १८४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डाबली (ता.मालेगांव, जि.नाशिक ) येथील शेतशिवाराऱ्यात टु फेज लाइन कायमस्वरुपी करण्याबाबत**

**(१५) ५९१६२ (०८-०५-२०२३). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डाबली (ता. मालेगांव, जि.नाशिक ) येथील शेतक-यांनी टु-फेज लाईन शेतशिवारात कायमस्वरुपी करण्यात यावी या मागणीकरिता वीज उपकेंद्रावर माहे जाने,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान आंदोलन केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत दोन वर्षापासून प्रलंबित असलेला प्रश्न मार्गी न लागल्यास शेतक-यांनी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, डाबली येथील ग्रामपंचायतीत पाणीपुरवठा करणा-या विहिरीला नवीन रोहित्र बसविण्यात यावे तसेच गेल्या अनेक वर्षापासून ट्रान्सफार्मर जीर्ण झाल्याने वांरवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने गावाचा पाणीपुरवठा प्रभावित होत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले, त्यानुसार शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०८-२०२३) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.
३३/११ केव्ही अजंग उपकेंद्रातील पॉवर ट्रान्सफॉर्मर क्र. १ वरुन ११ केव्ही डाबली वाहिनीचा वीज पुरवठा केला जात होता. सदर उपकेंद्रातील पॉवर ट्रान्सफॉर्मर क्र. १ अतिभारीत असल्याने दि.२५.११.२०२२ रोजी ११ केव्ही डाबली वाहिनीचा वीज पुरवठा सदर उपकेंद्रातील पॉवर ट्रान्सफॉर्मर क्र.२ वर स्थलांतरीत करण्यांत आलेला आहे. सद्यस्थितीत ११ केव्ही डाबली वाहिनीचा वीज पुरवठा सुरळीत सुरु आहे.
(४) डाबली येथील ग्रामपंचायतीला पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीसाठी स्वतंत्रपणे नवीन २५ केव्हीए रोहित्र जिल्हा वार्षिक योजना २०२२-२३ योजने अंतर्गत मंजूर करण्यात आले असून सदर रोहित्र उभारणीच्या कामाचा कार्यादेश दि. १२.०५.२०२३ रोजी देण्यात आला आहे व सदर रोहित्राचे काम प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खडकपूर्णा (जि बुलडाणा ) धरणाची उंची वाढविणेबाबत**

**(१६) ५९३१७ (२६-०४-२०२३). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खडकापूरणा धरण प्रकल्पाच्या दरवाजांना ०.३० मी चे फ्लॅप बसविल्यास सुमारे ९.१४६ द.ल.घ.मी. अतिरिक्त पाणीसाठा निर्माण करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री आणि मा. उपमुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ५ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाणी उपब्धतेचा अभ्यास करून बुलडाणा जिल्ह्यातील खडकापूर्णा धरणाची उंची वाढविण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खडकापूर्णा धरणाची उंची वाढविण्याच्या दृष्टीने पाणी उपलब्धतेचा अभ्यास करण्यासंदर्भात शासनाने अभ्यास समिती नेमली आहे काय, समितीच्या शिफारशी काय आहेत,
(४) असल्यास, समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने पाणी ऊपलब्ध असल्यास उंची वाढविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) खडकपूर्णा प्रकल्पाच्या दरवाजांना फ्लॅप लावून उंची वाढविणे या कामासाठी मुख्य अभियंता, जलविज्ञान प्रकल्प, नाशिक यांचे पाणी उपलब्धता प्रमाणपत्र आवश्यक असून तत्पूर्वी त्याबाबत प्रकल्प ज्या नदी खोऱ्यामध्ये आहे त्या संबंधित महामंडळाची पाणी उपलब्धतेबाबत सहमती आवश्यक आहे. मात्र खडकपूर्णा प्रकल्पाच्या प्रस्तावित वाढीव पाणी साठ्यामुळे निम्न बाजूस असलेल्या पूर्णा प्रकल्पाच्या दृष्टीने बाधा पोहोचण्याची शक्यता असल्याने, पाणी उपलब्ध नसल्यामुळे उंची वाढी बाबत कुठलीही कार्यवाही करणे शक्य नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही

---

**गफूर नगर (जि.धुळे) येथील इलेक्ट्रिक खांब्याला स्पर्श झाल्याने एका बालकाचा मृत्यू झाल्याबाबत**

**(१७) ५९६६४ (२७-०४-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे येथील गफूर नगरात इलेक्ट्रिक पोलला स्पर्श झाल्याने एका ८ वर्षीय बालकाचा जागेवरच मृत्यू झाला असल्याची दुर्दैवी घटना दिनांक १८ जानेवारी २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे , हे खरे आहे काय ,

(२) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले,

(३) असल्यास,चौकशीच्या अनुषंगाने सदर घटनेत मृत पावलेल्या बालकाच्या कुटुंबियांना शासनाने कोणती मदत केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०२३) :** (१) होय खरे आहे.

दि. १८.०१.२०२३ रोजी कु. अर्शद अहमद अशपाक मोमीन (बाह्यव्यक्ती), वय वर्ष ८ राहणार गफूर नगर वडजाई रोड, धुळे यांस विद्युत प्राणांतिक अपघात झाला.

(२) होय. सदर प्रकरणी विद्युत निरीक्षक गट-अ धुळे यांचेतर्फे चौकशी केली व त्याच्या अहवालानुसार कु. अर्शद अहमद अशपाक मोमीन हा मुलगा खेळत असताना लोखंडी विद्युत भारीत (स्ट्रीट लाईट) पोलच्या संपर्कात आल्याने त्यास विद्युत धक्का बसून सदर प्राणांतिक अपघात घडला. त्यामुळे सदर अपघातास महावितरण कंपनी मर्या. व धुळे महानगरपालिका संयुक्तरित्या जबाबदार असल्याचे कळविले आहे.

(३) विद्युत निरीक्षक गट-अ, धुळे यांचे पत्र दि. १३.०२.२०२३ अन्वये दिलेल्या चौकशी अहवालानुसार अपघात ग्रस्ताच्या कुटुंबियांना तात्काळ मदत रु. २०,०००/- देण्यात आली आहे. मृत पावलेल्या बालकाच्या कुंटुबियाना महावितरण कंपनीच्या नियमानुसार उर्वरित नुकसान भरपाई रक्कम रु. ३,८०,०००/- धनादेश क्र.९०८९३१, दि. ०७.०७.२०२३ नुसार अदा करण्यात आली आहे. सदरील अपघात प्रकरणी संबंधित सहाय्यक अभियंता व वरिष्ठ तंत्रज्ञ यांना कारणे दाखवा नोटीस बजविण्यात आल्या असून पुढील कारवाई सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्हयातील पुरंदर उपसा सिंचन योजनेची अनुषंगिक कामे करण्यासाठी निधी मिळण्याबाबत**

**(१८) ५९७६६ (०३-०५-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील पुरंदर उपसा सिचंन योजनेतील उर्ध्वगामीनलिका १ ते ६ टप्पे, साठवण बंधारा, पंप हाउस, वितरण कुंड, देखभाल-दुरुस्ती यांत्रिक व विदयुत कामाची देयके वितरीत करण्यासाठी ५७.७२ कोटी निधीची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यासाठी कृष्णा खोरे विकास महामंडळाने शासनास दिनांक १८ जानेवारी, २०१८ रोजी शासनास प्रस्ताव सादर केला असून प्रस्ताव अनेक वर्षापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रस्तावावर शासनाने निर्णय घेऊन पुणे जिल्हयातील अवर्षण भागातील हवेली (पूर्व), दौंड, पुरंदर, बारामती तालुक्यातील क्षेत्रास सिंचनाचा लाभ देण्यासाठी सदरील निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०९-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

पुरंदर उपसा सिंचन योजनेतील उर्ध्वगामीनलिका १ ते ६ टप्पे, साठवण बंधारा, पंप हाऊस, वितरण कुंड यांची देखभाल- दुरुस्ती, व अनुषंगिक खर्चासाठी प्रकल्पाचे सुप्रमा अहवालानुसार रु.६७.६९ कोटी निधीची आवश्यकता आहे. त्यापैकी कामाप्रित्यर्थ रु. ५७.७२ कोटी व अनुषंगिक खर्च रु. ९.९७ कोटी इतका आहे.

(२) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांच्याकडून प्राप्त पुरंदर उपसा सिंचन योजनेचा रु.४६०.९५ कोटी इतक्या रक्कमेच्या प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावास शासन निर्णय दिनांक ०८/०३/२०२३ अन्वये मान्यता दिलेली आहे.

(३) पुरंदर उपसा सिंचन योजनेचा समावेश अवशिष्ट अतंर्गत असून सन २०२३-२४ मध्ये सदर प्रकल्पास अवशिष्ट अंतर्गत रु.७ कोटीची तरतुद करण्यात आली आहे. उर्वरीत कामे अवशिष्ट अंतर्गत निधी उपलब्ध करुन प्रकल्प पुर्ण करण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वैभववाडी आणि राजापूर तालुक्यातील अरुणा धरण प्रकल्पाच्या उजव्या आणि डाव्या कालव्याचे काम पूर्ण करण्याबाबत

**(१९) ५९८३६ (०३-०५-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैभववाडी आणि राजापूर तालुक्यातील १९ गावांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या अरुणा धरण प्रकल्पाचे ९८ टक्के काम पूर्ण झाले असून केवळ कालव्यां अभावी साठवलेले पाणी नदीत सोडण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त प्रकल्पातील उजव्या आणि डाव्या कालव्याची एकूण ३७ किलोमीटरची कामे प्रलंबित असल्यामुळे धरणातील पाण्याचा सिंचनासाठी उपयोग होत होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन अपूर्ण अवस्थेत असलेल्या डाव्या व उजव्या कालव्यांची कामे तातडीने पूर्ण होण्याच्या अनुषंगाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, असल्यास त्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०९-२०२३) :**(१) होय, हे अंशत : खरे आहे.

अरुणा प्रकल्पांतर्गत सन २०२१-२२ च्या हंगामात धरणाची उर्वरीत कामे उदा. मातीकाम, अश्मपटल, संधानक, आपत्कालीन द्वार, शीघ्र स्वयंचलीत द्वार व सांडव्यावरील वक्राकार दरवाजे इ. कामे पुर्ण करण्यासाठी धरणातील पाणी नदीमध्ये सोडण्यात आले होते.

तथापि सन२०२२-२३ या हंगामात साठवलेले पाणी नदी पात्रामध्ये सोडण्यात आलेले नाही.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

सद्यस्थितीत अरुणा प्रकल्पांतर्गत डावा कालवा २३ किमी लांबीचा असून त्यापैकी १३ किमी पर्यंत पारंपारीक कालव्यावरील मातीकाम पुर्ण असून त्यावरील ८० टक्के बांधकामे पुर्ण करण्यात आलेली आहेत.

डावा कालवा १३ किमी च्या पुढे २३ किमी मधील बंदिस्त नलिका, व उजवा कालवा १४.२५ किमी लांबीचा बंदिस्त नलिकेद्वारे करण्याचे नियोजित आहे.

सद्यस्थितीत बंदिस्त नलिकेसाठी सिमांकन, पंचनामा, मुल्यांकन व पिक नुकसान भरपाई कार्यवाही करणे प्रगतीपथावर आहेत. उपरोक्त कार्यवाही व बंदिस्त नलिकेची कामे मे-२०२४ अखेर करुन प्रकल्प सिंचनाखाली आणण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्ह्यात घरफोडीचे जवळपास १५० प्रकरणे निदर्शनास आल्याबाबत**

**(२०) ५९९५७ (०३-०५-२०२३). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यात ४३ दिवसात घरफोडीचे जवळपास १५० प्रकरणे माहे जानेवारी, २०२३, मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर जिल्ह्यातील वाढते घरपोडीचे प्रकार रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०२३) :** (१) नागपूर ग्रामीण घटकात जानेवारी २०२३ ते १५ फेब्रुवारी, २०२३ या कालावधीत नागपूर पोलीस आयुक्तालयाच्या अखत्यारीतील कार्यक्षेत्रामध्ये ११४ आणि पोलीस अधीक्षक, नागपूर (ग्रामीण) या कार्यालयाच्या अखत्यारीतील कार्यक्षेत्रामध्ये ३० असे एकूण १४४ घरफोडीचे गुन्हे दाखल झाले आहेत.

(२) घरफोडीच्या गुन्हयांवर आळा घालण्याकरीता नियमितपणे रात्रगस्त, नाकाबंदी, पेट्रोलिंग, संभावित ठिकाणी फिक्स पाईन्ट ड्यूटी इ. कार्यवाही करण्यात येत असून पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुन्हयांच्या पध्दतीप्रमाणे अभिलेखावरील पुर्व गुन्हेगारांच्या हालचालीवर नजर ठेवून घरफोडीच्या गुन्ह्यांवर प्रतिबंध लावण्यात येत आहेत.

तसेच स्थानिक शासकिय व खाजगी संस्थेच्या आर्थिक सहकार्याने सार्वजनिक ठिकाणी सीसीटिव्ही कॅमेरे लावण्याची कार्यवाही सुरू आहे.

घरफोडीच्या गुन्हयांचा तपास करून आरोपीविरूध्द प्रतिबंधक कार्यवाही करण्यात येत आहे.

स्थानिक गुन्हे शाखेच्या विशेष पथकाकडुन घरफोडीच्या गुन्हयांचा समांतर तपास करून गुन्हे उघड करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**समृद्धी महामार्गाच्या उपयोगिता क्षेत्रात गेल इंडिया लिमिटेड नोएडा (उप) या कंपनीमार्फत अवैध खोदकाम केल्याबाबत**

**(२१) ५९९८४ (२६-०४-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र समृद्धी महामार्ग उपयोगिता क्षेत्रात अमरावती जिल्ह्यात येणाऱ्या विविध नद्या , नाले , कॅनल , यावरून (भूमिगत) गॅस पाईपलाईन टाकण्याचे काम गेल इंडिया लिमिटेड नोएडा (उ प) या कंपनीमार्फत सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कार्यकारी अभियंता ऊर्ध्व वर्धा पाटबंधारे विभाग अमरावती यांचे वरिष्ठ प्रबंधक यांच्या गेल इंडिया यांना दिनांक १९/०१/२०२१ रोजी दिलेल्या पत्रान्वये जिल्हाधिकारी अमरावती यांची रीतसर परवानगी घेऊन खोदकाम करावे असे स्पष्ट निर्देश असताना सदर कंपनीने नियम व अटींचा भंग करून परस्पर नियमबाहय परवानगी न घेता खोदकाम केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, गौण खनिजाची परवानगी देताना शासन राजपत्र दिनांक १४ नोव्हेंबर, २०१८ नुसार अटि व शर्ती नुसार नद्या, नाले , तलाव , जलाशय , कालवे व अन्य जलसंवर्धीत बाबींना नुकसान होणार नाही पुलाच्या किंवा बांध बंधाराच्या सुरक्षा क्षेत्रात खोदकाम करता येणार नसल्याचे नमूद आहे, हे ही खरे आहे काय ,

(४) असल्यास, सदर गॅस पाईपलाईनचे कामासाठी होणाऱ्या खोदकामामुळे नदी नाला कालव्यांच्या पात्राच्या तळातून अंदाजे ३ मीटर जमिनीच्या खालून विनापरवानगी खोदकाम सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय ,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर नियमबाह्य सर्व नियम डावलून खोदकाम करणाऱ्या गेल इंडिया या कंपनीवर काय दंडात्मक कार्यवाही करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही,
कार्यकारी अभियंता उर्ध्व वर्धा पाटबंधारे विभाग, अमरावती या कार्यालयाने दि. १७.९.२०२१ व दि. ९.२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये ३ नदी प्रवाह व २२ कालव्यांच्या खालून खोदकामाचे ना-हरकत प्रमाणपत्र गेल इंडिया कंपनीला दिले असून त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दि. २९.४.२०२२ च्या पत्रान्वये गेल इंडिया कंपनीस खोदकामाचे ना-हरकत प्रमाणपत्र दिले आहे.
(३) गौण खनिजाची परवानगी देण्याची बाब जलसंपदा विभागाच्या कार्यकक्षेत येत नाही.
सदर प्रकरणी जलसंपदा विभागाकडून नदी प्रवाह व कालवे यांचे खालून भूमिगत पाईपलाईन टाकण्याकरिता ना-हरकत देण्यात आली आहे.
तसेच जिल्हाधिकारी अमरावती यांचेकडून दि. २९.०४.२०२२ च्या पत्रान्वये देण्यात आलेल्या ना-हरकत प्रमाणपत्रामध्ये, “गॅस पाईपलाईन टाकत असताना कोणत्याही प्रकारचे उत्खनन करण्यात येणार नाही किंवा गौण खनिजाचा वापर देखील करण्यात येणार नाही”, अशी अट अंतर्भुत करण्यात आली आहे.
(४) नाही, हे खरे नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बाभुळगाव (जि. यवतमाळ) येथील अधिग्रहीत न केलेल्या शेतक-यांच्या शेतजमिनी मध्ये बेंबळा प्रकल्पाचे पाणी जाऊयन शेतीचे झालेले नुकसान

**(२२) ६००९२ (०३-०५-२०२३). डॉ.अशोक उईके (राळेगाव), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बाभुळगाव (जि. यवतमाळ) येथील श्री गोपाल गणपतराव बावनकर , श्री सुदाम महादेव डोलार, रा. फाळेगाव, श्री संजय ऐकनाथ शिंदे, रा. कोल्ही यांची शेत सर्वे क्र. ५३,५५,११५ बेंबंळा प्रकल्पाच्या बाजुला असल्याने प्रकल्पामध्ये पाणी साठा वाढल्याने शेतक-याच्या शेतात पाणी जाऊन शेतपिकाचे नुकसान होत असल्याचे दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पामधील काही शेत जमीनी अधिग्रहीत केल्या नसल्याने त्या शेतजमिनीतील शेतात पाणी जाऊन पिकाचे नुकसान होत असल्यामुळे तेथील शेतक-यांनी शासन स्तरावरून चौकशी करण्यासाठी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय वा करण्यात येत आहे, तसेच सदर दिलेल्या निवेदनावरून शेतपिकाचे नुकसान झालेल्या शेतक-यांना मोबदला देणे व जमिनी अधिग्रहण करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
शेत सर्व्हे क्र.५३, ५५ मध्ये अधिग्रहीत न केलेल्या जमिनीमध्ये पाणीसाठा वाढल्याने शेतपिकाचे नुकसान झाले असून शेत सर्व्हे क्र. ११५ मध्ये अधिग्रहीत न केलेल्या जमिनीमध्ये नुकसान झालेले नाही.
(२) हे खरे आहे.

(३) गट क्र. ५३ व ५५ चे बेंबळा प्रकल्पामुळे नुकसान होत असुन शेतकऱ्यांची जमीन अधिग्रहण करण्याबाबतची मागणी असल्याने सरळ खरेदी पध्दतीने जमीन अधिग्रहण करण्याची कार्यवाही अंतीम टप्प्यात आहे. याबाबत जिल्हाधिकारी कार्यालया मार्फत मोबदला निश्चितीचा प्रस्ताव मंजूर करण्यात आलेला आहे. सदर मंजूर प्रस्तावात नमुद गट क्र. ५३ व ५५ चा समावेश असून गट क्र.११५ चा आवश्यकता नसल्याने त्याचा अंतर्भाव नाही.

या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालया मार्फत भूसंपादन मोबदला निश्चितीच्या प्रस्तावा प्रमाणे गट क्र. ५३ चे बाधीत १.३३ हे. करिता रू. ३४,५८,०००/- व गट क्र.५५ चे बाधीत ०.४० हे. करिता रू.१०,४०,०००/- चा मोबदला निश्चित झाला असुन त्यानुसार सदर बाधीत होणाऱ्या क्षेत्राचे सरळ खरेदी पध्दतीने भुसंपादन करण्याची कार्यवाही अंतीम टप्प्यात आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बारामती व पुरंदर (जि. पुणे) तालुक्यातील नीरा डाव्या कालव्याची दुरुस्ती करण्याबाबत**

**(२३) ६०१३३ (०३-०५-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुरदंर (जि.पुणे) तालुक्यातील नीरा डावा कालवा या कालव्याचे आयुष्यमान सव्वाशे वर्षाचे झाले असून बिटीशकालीन अस्तरीकरण जीर्ण झाले असल्याने कालवा फुटण्याचा धोका वाढला असल्याणे कालव्याची देखभाल-दुरुस्ती करणे गरजेचे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कालव्याचे तातडीने अस्तरीकरण व मातीचे भरावे मजबुतीकरण करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०९-२०२३) :** (१) होय,

निरा डाव्या कालव्याचे बांधकाम ब्रिटीश काळामध्ये सन १८८२ ते १८८७ दरम्यान झाले असून सद्य:स्थितीत कालव्याच्या कामास साधारणत: १३५ वर्षे पूर्ण झालेली आहेत. सदर कालवे व वितरण प्रणाली, विना अस्तरीकरण असून सद्य:स्थितीत कालव्याचा भराव ठिकठिकाणी कमकुवत झाला असून कालव्यावरील बांधकामे जीर्ण झालेली असल्याने कालवा संकल्पित विसर्गाने वाहत नाही.

(२) निरा डावा कालव्यावरील बारमाही क्षेत्रामुळे वाढलेला ताण व गळतीमुळे होणारा वहनव्यय विचारात घेता कालव्याचे भराव मजबुतीकरण, बांधकामे दुरूस्ती व निवडक अस्तरीकरण इ. गळतीप्रतिबंधक कामे करणे आवश्यक असून या कालव्याचे सन २०२१-२२ मध्ये बिगर सिंचन प्रापणसूचीमधून सदर कालव्याचे निवडक ठिकाणी अस्तीरकरण व भराव मजबुतीकरण कामे मंजूर करण्यात आली आहेत. यातून निरा डावा कालव्याचे ३४.३२ कि.मी. अंतराचे अस्तरीकरण व मजबुतीकरण करणे प्रगतीपथावर आहे. तसेच कि.मी. ७५ ते ८१ मधील एकूण ०६ कि.मी. लांबीच्या कालव्याचे अस्तरीकरण व मजबुतीकरण पूर्ण करण्यात आलेले आहे.

निरा डावा कालव्यावरील जीर्ण जलसेतूच्या बांधकामाच्या दुरूस्तीकरीता व कमान मोरी (Culvert) १ ते ९५ च्या पुनर्स्थापनाचे काम करणे तसेच निरा डावा कालवा सा.क्र.१/१०० वरील जलझुंपी शुंडिका (SEF) दुरूस्ती करणे व इतर अनुषंगिक कामे करणेबाबतचा अंदाजित रू.११९.७० कोटी रकमेच्या कामांचा समावेश विशेष दुरूस्ती / विस्तार व सुधारणा लेखाशिर्षाअंतर्गत प्राधान्यक्रम यादीत करणेसाठी सदर प्रस्ताव नियामक मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यास दि.११/०४/२०२३ रोजी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या कार्यकारी समितीच्या १६८ व्या बैठकीमध्ये शिफारस करण्यात आली आहे. सदर कामाच्या प्राधान्यक्रमास नियामक मंडळाची मान्यता प्राप्त करून घेऊन प्रशासकीय मान्यता घेणेच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हाडोळती (ता. अहमदपूर, जि.लातूर) विजेचे ३३ के.व्ही.वीज केंद्रातील खंडीत करण्यात आलेला वीज पुरवठा पूर्ववत सुरु करण्याबाबत..

**(२४) ६०३३२ (२७-०४-२०२३). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हाडोळती (ता. अहमदपूर, जि.लातूर) विजेचे ३३ के.व्ही.वीज केंद्रातील १७ गावांत राहणाऱ्या शेतकऱ्यांना शेती पंपासाठी वीज पुरवठा करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिवृष्टी, वाढलेली महागाई, खतबियाण्यांच्या वाढलेल्या किंमती यामुळे शेतकरी आधीच त्रस्त झाला असतांना शेतकऱ्यांच्या कृषी पंपाचे वीज पुरवठा दिनांक २० नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान खंडीत करण्यात आला आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय असून खंडीत करण्यात आलेला वीज पुरवठा पूर्ववत सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०८-२०२३) :** (१) हे खरे आहे.

अहमदपूर तालुक्यातील (जि. लातूर) हाडोळती विजेचे ३३ के. व्ही. वीज केंद्राव्दारे १६ गावात राहणाऱ्या १४५९ कृषीग्राहकांना शेतीपंपासाठी वीज पुरवठा करण्यात येत आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) विद्युत कायदा २००३ व कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२० मधील तरतूदीनुसार, कृषी देयकाची थकबाकी असलेल्या एकूण ४३० कृषी ग्राहकांचा विद्युत पुरवठा खंडीत करण्यात आला होता. परंतु शेतकऱ्यांचे अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान व सुरु असलेला रब्बी हंगाम विचारात घेवून मा. उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री यांनी दिलेल्या निर्देशानुसार कृषी पंप ग्राहकांचा वीजपुरवठा चालू किंवा थकीत देयकांच्या वसुलीकरीता अथवा इतर कोणत्याही कारणास्तव खंडीत करण्यात येवू नये असे दि.१०.१२.२०२० रोजीच्या पत्रान्वये क्षेत्रिय कार्यालयांना कळविण्यात आले आहे. त्यानुसार सर्व ४३० कृषीपंपाचा वीज पुरवठा पूर्ववत जोडण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औसा (जि.उस्मानाबाद) येथील पाझर तलाव व प्रकल्पासाठी संपादित कॅनल व इतर पडीक जागा स्मशानभूमीसाठी वापरण्यास परवानगी देणे बाबत

**(२५) ६०४२६ (०३-०५-२०२३). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा (जि.उस्मानाबाद) येथील स्मशानभूमी नसलेल्या गावात स्मशानभूमीसाठी गावाशेजारील पाझर तलाव व इतर प्रकल्पासाठी किंवा त्यांच्या कॅनल साठी संपादित केलेल्या परंतु पडीक जमिनीतील जागा आवश्यकेतेनुसार वापरासाठी देण्याबाबत व त्याठिकाणी स्मशानभूमी शेड बांधकाम करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी लातूर जिल्हा नियोजन समितीच्या दि.३ नोव्हेंबर, २०२२ रोजी व त्यासुमारास झालेल्या बैठकीत पालकमंत्री लातूर यांच्याकडे मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त स्मशानभूमीसाठी जागाच नसलेली किती गावे असून उक्त मागणीच्या अनुषंगाने स्मशानभूमीसाठी जागा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०२३) :** (१) होय, खरे आहे.

(२) उक्त स्मशानभूमीसाठी जागाच नसलेली गावे ही बाब जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखाली येत नाही. तथापि,

महामंडळाच्या अखत्यारीत शासन संपादीत जमीनीची भविष्यात मागणी प्राप्त झाल्यास सदरील जागा उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने महामंडळाच्या नियामक मंडळाच्या बैठकीमध्ये निर्णय घेऊन पुढील कार्यवाही करता येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्ह्यात २०१९ च्या कास्ट डाटा (सि एस आर )नुसार कृषी पंपाचे मंजूर असलेले अंदाजपत्रक रद्द करून सुधारित अंदाजपत्रकांना मंजुरी देण्याबाबत**

**(२६) ६०५९८ (०८-०५-२०२३). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यात सन २०१८ पासूनच्या कृषी पंपाना विज जोडणी चे काम पूर्णतः बंद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०२२ मध्येही २०१९ च्या कास्ट डाटा (सि एस आर ) नुसार अंदाजपत्रक मंजूर असल्याने कंत्राटदार २०१९ च्या दरानुसार कृषी पंपाचे काम करण्यास तयार नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गडचिरोली सारख्या सिंचन विरहित जिल्ह्यात कृषी पंप हाच शेतीला आधार आहे मात्र कृषी पंपाचे काम बंद असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सन २०१९ च्या कास्ट डाटा नुसार मंजूर असलेले अंदाजपत्रक रद्द करून नव्याने २०२२ च्या कास्ट डाटानुसार (सि एस आर ) नुसार अंदाजपत्रकांना मंजुरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०२३) :** (१) हे खरे नाही.
गडचिरोली जिल्हयात एप्रिल २०१८ पासून दि.२८.०५.२०२३ पर्यंत एकूण ५७३३ कृषीपंपांना कृषीपंप वीज जोडणी धोरण २०२० अंतर्गत वीज जोडण्या देण्यात आल्या असून उर्वरित १८९७ कृषीपंपांना वीज जोडणी देण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(२) हे खरे नाही.
महावितरणव्दारे नवीन कॉस्ट डाटा सन २०२२-२३ माहे नोव्हेंबर २०२२ मध्ये लागू करण्यात आला असून त्यानुसार डिसेंबर २०२२ पासून कंत्राटदारांना नवीन कॉस्ट डाटा नुसार कामे देण्यात येत आहे. सदर नवीन कॉस्ट डाटा लागू होई पर्यंत अस्तित्वात असलेल्या सन २०१९-२० च्या कॉस्ट डाटा नुसार कामे करण्यात येत होती.
(३) हे खरे नाही.
(४) माहे नोव्हेंबर २०२२ मध्ये नवीन कॉस्ट डाटा सन २०२२-२३ लागू झाल्यानंतर सुधारीत कॉस्ट डाटा नुसार अंदाजपत्रक मंजूर करण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चाळीसगाव (जि.जळगाव) तालुक्यात पोलीस पाटील हे पद रिक्त असल्याबाबत**

**(२७) ६०६५४ (०३-०५-२०२३). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चाळीसगाव (जि.जळगाव) तालुक्यातील एकूण ४४ गावांना महसूल दर्जा प्राप्त असून शासकीय नियमाप्रमाणे सदर गावातील कायदा सुव्यवस्था अबाधित राहावी म्हणून पोलीस पाटील नियुक्ती होणे गरजेचे आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मात्र आजतागायत या गावांना पोलीस पाटील नियुक्ती न झाल्याने ग्रामस्थांना व पोलिसांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय ,चौकशीत काय आढळून आले त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०२३) :** (१) हे खरे नाही.

चाळीसगांव (जि. जळगाव) तालुक्यात एकूण १४७ गावांना महसुली दर्जा प्राप्त असून सद्यस्थितीत १०४ गावांत पोलीस पाटील कार्यरत आहेत.

(२) हे खरे नाही.

रिक्त पदे असलेल्या गावांचा पोलीस पाटील पदाचा कार्यभार लगतच्या गावातील पोलीस पाटील यांना संबंधित पोलीस निरीक्षक यांच्यामार्फत देण्यात आला आहे.

(३) पोलीस पाटील रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत राबविण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर शहरातील महाराष्ट्र वीज वितरण कंपनीच्या तीन सबस्टेशनची उंची वाढवण्याबाबत**

**(२८) ६०७३७ (०३-०५-२०२३). श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील राज्य वीज वितरण कंपनीच्या तीन सब स्टेशनची उंची वाढविण्यासाठी सुमारे ७ कोटी २१ लक्ष रुपयांच्या निधीची मागणी विधानसभा सदस्य यांनी दिनांक १० ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास ऊर्जा मंत्री यांच्याकडे केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, दुधाळी, नागाळा पार्क व बापट कॅम्प ही तीनही सब स्टेशन माहे जुलै, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या महापुरामुळे पुराच्या पाण्यात बुडाली असल्याने कोल्हापूर शहरातील सुमारे ७३ हजार वीज ग्राहकांचा विदयुत पुरवठा खंडीत करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील सब स्टेशनच्या कामांचा प्रस्ताव संबंधीत वीज वितरण कंपनीने शासनाकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू तीन सब स्टेशनना सुमारे ७ कोटी २१ लक्ष रुपयांच्या निधी उपलब्ध करुन प्रशासकीय मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

दुधाळी, नागाळा पार्क व बापट कॅम्प ही तीनही सब स्टेशन माहे जुलै, २०२१ मध्ये आलेल्या महापुरामुळे पुराच्या पाण्यात अंशत: बुडाली असल्याने कोल्हापूर शहरातील सुमारे ७४,३९२ इतक्या वीज ग्राहकांचा विद्युत पुरवठा तात्पुरत्या स्वरुपात बाधीत झाला होता.

(३) व (४) हे खरे आहे.

महावितरणव्दारा सदर तीन सबस्टेशनची उंची वाढविण्याबाबतचा रु.११.५१ कोटी इतक्या रकमेचा सुधारित तपशीलनुसार प्रकल्प अहवालासह प्रस्ताव दि. ३०.०६.२०२३ रोजी आपत्ती विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांचेकडे जिल्हा वार्षिक योजनेमध्ये (DPDC) अंतर्भुत करण्यासाठी तपशीलवार प्रकल्प अहवाल सादर करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आर्वी (जि.वर्धा) येथील निम्न वर्धा प्रकल्पाअंतर्गत पुनर्वसित गावामध्ये निधी मंजूर करुन सुविधा पुर्ण करण्याबाबत**

**(२९) ६०७८५ (२६-०४-२०२३). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी (जि.वर्धा) येथील निम्न वर्धा प्रकल्पाअंतर्गत पुनर्वसित गावामध्ये अजून पर्यत १८ नागरी सुविधा पुर्ण करण्यात आल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तालुक्यातील पुनर्वसित गावामध्ये पाणी पुरवठा योजना, अंतर्गत रस्ते, नाले, विद्युतिकरण, शाळा व समाज मंदिर दुरूस्त्या, शेतकऱ्यांना शेतीपर्यतचे पोहोच रस्ते अजूनपर्यत अपूर्ण आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुनर्वसित गावांच्या १८ नागरी सुविधा व देखभाल दुरूस्ती करिता स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी रु. ५० कोटी निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०८-२०२३) :** (१) हे खरे नाही.

निम्न वर्धा प्रकल्पांतर्गत पुनर्वसित करण्यात आलेल्या वर्धा जिल्ह्यातील सर्व २३ गावठाणात १८ नागरी सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत. निंबोली-दौलतपुर वगळता इतर २२ पर्यायी गावठाण जिल्हा परिषद वर्धा ला हंस्तांतरित करण्यात आलेली आहे.

(२) हे खरे नाही.

निम्न वर्धा प्रकल्पांतर्गत पुनर्वसित गावठाणात १८ नागरी सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत.

(३) होय, हे खरे आहे.

(४) सदर पुनर्वसित गावठाणे जिल्हापरिषद, वर्धा यांच्याकडे हस्तांतरीत झाली असल्याने, नागरी सुविधांचे दुरुस्ती हे जिल्हा परिषद मार्फत होणे अपेक्षीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य महावितरण तर्फे राज्यातील घरगुती वीज ग्राहकांच्या वीज वापराचे रिडिंग घेण्याचे काम खाजगी एजन्सीला देण्यात आल्याबाबत**

**(३०) ६०८९१ (२७-०४-२०२३). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य महावितरण तर्फे राज्यातील घरगुती वीज ग्राहकांच्या वीज वापराचे रिडिंग घेण्याचे काम खाजगी एजन्सीला देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील एजन्सीचे कर्मचारी घरोघरी न जाता कार्यालयात बसून अंदाजे युनिट नोंदणी देत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ रोजीच्या सुमारास निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित एजन्सीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

महावितरणकडून ग्राहकांचे वीज देयक त्यांच्या मीटर मधील नोंद झालेल्या वापरानुसार देण्यात येते. अपवादात्मक

परिस्थितीमध्ये वीज मिटर रिडींग उपलब्ध नसल्यास त्यांचे देयक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे सरासरी वीज वापरानुसार देण्यात येते.

(३) ग्राहकाच्या मीटरचे वाचन हे प्रत्यक्ष वापराप्रमाणे होत असल्याचे पडताळणी करण्याकरिता रिडींग एजन्सीने नोंद केलेले रिडींग व मीटरच्या फोटोमधील रिडींग याची तपासणी महावितरणच्या कर्मचाऱ्यांद्वारे करण्यात येते.

(४) ग्राहकांच्या मीटरचा फोटो सुस्पष्ट असण्याचे प्रमाण कमी असलेल्या राज्यातील एकूण ७६ उपविभागातील मीटर रिडींग एजन्सीचे कंत्राट सन २०२२-२३ दरम्यान रद्द करण्यात आले.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महावितरण कंपनीअंतर्गत असलेल्या PUBLIC SERVICE कॅटेगरीमधील ग्राहकांचा NSC स्कीममध्ये समावेश करण्याबाबत**

**(३१) ६०९१२ (०३-०५-२०२३). श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.सुनिल शेळके (मावळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरण कपंनीमध्ये वीज ग्राहकांची नवीन वीज जोडणी (NEW SERVICE CONNECTION) या योजनाद्वारे घरगुती, व्यापारी, औद्योगिक या ग्राहकांची कामे कंपनी मार्फत केली जातात, मात्र लोकसेवा (PUBLIC SERVICE) योजना मध्ये जे ग्राहक येतात, उदा. शाळा, कॉलेज, दवाखाने, शासकीय कार्यालये यांचा या योजनमध्ये समावेश नसल्याने त्याना योजनेचा लाभ मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोकसेवा (PUBLIC SERVICE) या योजनेतील ग्राहक हे देखील जनतेच्या सेवेसाठी असुनही या ग्राहकांचा नवीन वीज जोडणी (NSC) योजनेमध्ये समावेश नसल्याने या ग्राहकांना स्वखर्चाने काम करुन घ्यावी लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन लोकसेवा (PUBLIC SERVICE ) या योजनेमधील ग्राहकांना नवीन वीज जोडणी योजनेमध्ये समावेश करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०२३) :** (१) हे खरे नाही.

कृषी ग्राहक वगळून इतर सर्व ग्राहकांना NEW SERVICE CONNECTION या योजनाचा लाभ घेता येतो.

(२) हे खरे नाही.

लोकसेवा (PUBLIC SERVICE) ग्राहकांना NEW SERVICE CONNECTION या योजनेचा लाभ घेता येतो.

(३) मा. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने दिलेल्या आदेशानुसार लोकसेवा (PUBLIC SERVICE) ग्राहकांना NEW SERVICE CONNECTION या योजनेतून नवीन वीज जोडणी देण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मोर्शी व वरुड (जि. अमरावती) तालुक्यात शेतीसाठी स्वतंत्र फीडर वा २०० केव्हिए ट्रान्सफार्मवर बसविण्याबाबत**

**(३२) ६०९८८ (०३-०५-२०२३). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोर्शी, वरुड (जि. अमरावती) या तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणात असलेल्या संत्रा बागांच्या सिंचनासाठी शेतक-यांना वीज जोडणी देण्यात आलेल्या डिपीवर प्रचंड विदयुत भार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १०० के.व्ही. ट्रान्सफार्मवर प्रचंड भार येऊन शेतक-यांच्या वीज मीटर जळण्याच्या घटना वाढल्यामुळे शेतीसाठी सिचंनाद्वारे पाणी मिळत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विदयुत भारानुसार २०० के.व्ही. किंवा असलेल्या विदयुत भारानुसार ट्रान्सफार्मवर लावुन देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
परंतु काही ठिकाणी रोहित्रे अतिभारित झाल्यामुळे वर्ष २०२२-२३ मध्ये एकूण १७ रोहित्रे व वर्ष २०२३-२४ मध्ये एकूण २ रोहित्र निकामी होण्याच्या घटना घडल्या आहेत.
(३) वर्ष २०२३-२४ मध्ये सर्व साधारण जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत (DPDC) एकूण ३२ नविन रोहित्र व २ रोहित्रांची क्षमतावाढ प्रस्तावित करण्यात आली असून प्रशासकीय मान्यतेकरिता प्रक्रियाधीन आहे. निधी प्राप्त होताच सदर काम प्राधान्याने पूर्ण करण्याचे नियोजन आहे. याशिवाय सुधारित वितरण क्षेत्र (RDDS) योजनेअंतर्गत वितरित प्रणालीमध्ये विविध स्तरावर क्षमतावाढ प्रस्तावित केलेली आहे. योजनेच्या या घटकास केंद्र शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही प्राधान्याने करण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंबरनाथ येथील पालेगाव औद्योगिक क्षेत्रातील भूखंड महावितरणाच्या सबस्टेशन उभारणी करिता देण्याबाबत

**(३३) ६१०१० (०३-०५-२०२३). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबरनाथ येथील पालेगाव औद्योगिक क्षेत्रातील भूखंड महावितरणाच्या सबस्टेशन उभारणी करिता देण्यात यावा अशी लेखी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी उर्जा मंत्री, यांचेकडे दिनांक २० जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अंबरनाथ येथील पालेगाव औद्योगिक क्षेत्रात नविन २२/२२ केव्ही स्विचिंग स्टेशन प्रस्तावित करण्यात आले असून या स्विचिंग स्टेशनसाठी लागणारी जागा महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाकडून राखीव ठेवण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राखीव ठेवण्यात आलेली जागा अद्यापर्यंत महवितरणाकडे सूपूर्द करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राखीव ठेवण्यात आलेला भुखंड पालेगाव औद्योगिक क्षेत्रातील भूखंड महावितरणाच्या सबस्टेशन उभारणी करिता देण्यात येण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) पालेगाव औद्योगिक क्षेत्रातील महावितरणच्या स्विचिंग स्टेशन उभारणी करीता लागणा-या राखीव भुखंडाच्या भुसंपादनाचे काम प्रक्रियाधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आनंदनगर ,अंबरनाथ (जि.ठाणे) येथील अतिरिक्त औद्योगिक वसाहतीतील उच्च दाब जोडणी असलेल्या ग्राहकांना सुरक्षा अनामत रक्कम भरण्याबाबत देण्यात आलेल्या नोटीसा**

**(३४) ६१०१७ (२७-०४-२०२३). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथमधील आनंदनगर येथील अतिरिक्त औद्योगिक वसाहतीतील उच्च दाब जोडणी असलेल्या ग्राहकांना सुरक्षा अनामत रकमेच्या नावाखाली माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान लाखो रुपयांच्या नोटिसा महावितरणकडून पाठविण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनामत रक्कम न भरल्यास कारवाई करण्याचा इशाराही महावितरणकडून उद्योजकांना देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उद्योजक आधीच आर्थिक संकटात असतांना महावितरणकडून अचानक ५ ते १० लाखांच्या नोटीसा देण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०२३) :** (१) हे खरे आहे.

अंबरनाथमधील आनंदनगर अतिरिक्त औद्योगिक वसाहतीअंतर्गत असणाऱ्या १२२ उच्चदाब ग्राहकांना अतिरिक्त सुरक्षा अनामतीची देयके पाठविण्यात आली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या दि.२४.०२.२०२१ नुसार प्रसृत महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता, वितरण परवानाधारकांच्या कृतीचे मानके आणि पावॅर क्वालिटी) विनियम, २०२१ कलम १३.६ मधील तरतुदीनुसार वितरण परवाना धारकाला ग्राहकाकडे अतिरिक्त सुरक्षा ठेवीच्या रक्कमेची मागणी करता येते. त्या अनुषंगाने माहे एप्रिल, २०२२ या महिन्यात ग्राहकांना अतिरिक्त सुरक्षा ठेवीचे स्वतंत्र देयक देण्यात आले होते.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विक्रमगड तालुक्यातील (जि.पालघर) पोलीस पाटलांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(३५) ६१०८३ (०३-०५-२०२३). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड (जि.पालघर) या आदिवासी बहुल तालुक्यातील ६० गावांत पोलीस पाटलांच्या ६० मंजूर पदांपैकी २७ गावातील पोलीस पाटलांची पदे मागील काही वर्षांपासून रिक्त असून या गावांचा कारभार अतिरिक्त कार्यभार म्हणून अन्य गावांतील पोलीस पाटलांवर असल्याने त्यांच्यावर अतिरिक्त ताण पडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गावांतील ग्रामस्थांना विविध दाखल्यांसाठी अनेक गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत असुन या २७ गावांतील शांततेच्या संदर्भात अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने या गावांतील पोलीस पाटलांची रिक्त पदे विनाविलंब भरण्यासाठी मागील २ वर्षांपासून सातत्याने मा.मुख्यमंत्री, गृहमंत्री, जिल्हा पोलीस प्रमुख, जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू २७ गावांतील पोलीस पाटलांची रिक्त पदे त्वरित भरण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०२३) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

विक्रमगड तालुक्यासाठी पोलीस पाटील यांची ९४ पदे मंजूर असून त्यापैकी ४३ पदे कार्यरत आहेत व ५१ पदे रिक्त आहेत.

पोलीस पाटील पद रिक्त असलेल्या गावाचा अतिरिक्त कार्यभार नजीकच्या पोलीस पाटील यांच्याकडे देण्यात आलेला आहे.

(२) हे खरे नाही.

गावातील ग्रामस्थांना विविध दाखल्यांसाठी गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत असल्याबाबत, तसेच गावातील शांततेच्या संदर्भात अडचणींना सामोरे जावे लागत असल्याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त नाही.

(३) विक्रमगड तालुक्यातील रिक्त पोलीस पाटील पदे भरती प्रक्रिया राबविण्यासाठी पदांची बिंदूनामावली तयार करून मा. सहायक आयुक्त (मावक), कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांचेकडून प्रमाणित करून पोलीस पाटील पदे भरण्याची कार्यवाही उपविभागीय दंडाधिकारी, वाडा यांचेकडून चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबई पोलीस आयुक्तालय हद्दीतील मोरा पोलीस ठाण्याला अपुरी कर्मचारी वर्ग असल्याबाबत

**(३६) ६११६८ (०४-०५-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई पोलीस आयुक्तालय हद्दीतील मोरा पोलीस ठाण्यात अपुरी कर्मचारी संख्या व अत्याधुनिक साधनसामुग्री कमतरता असल्यामुळे अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे जानेवारी २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पोलीस ठाण्यात गस्ती नौका उपलब्ध नसल्यामुळे गस्तीवर जाणा-या पोलीस कर्मचा-यांना रात्री अपरात्री अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असून मोरा - भाऊचा धक्का खाजगी होडीसाठी तासनतास प्रतिक्षा करावी लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून नवी मुंबई पोलीस आयुक्तालय हद्दीतील मोरा पोलीस ठाणे येथे पोलीस कर्मचा-यांची भरती करण्यासाठी तसेच गस्ती नौका उपलब्ध करून देण्याबाबत कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) मोरा पोलीस ठाणे येथे स्वतंत्र बोटीची व्यवस्था नाही. मात्र मोरा पोलीस स्टेशन यांच्या मागणीप्रमाणे समन्वय ठेवून सागरी सुरक्षा शाखा नवी मुंबई मधील नौका हया मोरा घारापूरी परिसरात नियमीत सागरी गस्तीकरीता नेमण्यात येतात.

पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई मधील सन २०२२ सर्वसाधारण बदल्यामध्ये मोरा सागरी पोलीस ठाणे येथे ०९ पोलीस अंमलदार कर्तव्याकरीता देण्यात आलेले आहेत. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे आस्थापनेवरील सन २०२१ मध्ये भरती करण्यात आलेल्या २०४ पोलीस शिपाई यांचे मुलभुत प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतर आवश्यकतेनुसार मोरा पोलीस ठाण्यास पोलीस शिपाई नेमण्यात येतील. तसेच सागरी सुरक्षिततेच्या दृष्टीने सागरी सुरक्षा शाखा, नवी मुंबई विभागाकडून दिवस व रात्र पाळी करीता मोरा, घारापुरी भागात १ अधिकारी, २ अंमलदार योग्य त्या साधन सामुग्रीसह नियमित सागरी गस्तीसाठी नेमण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राधानगरी (जि. कोल्हापूर) धरणाचा पाणीसाठी आणि पूर नियंत्रणाच्या योजनेचे काम पूर्ण करण्याबाबत**

**(३७) ६१२६८ (०८-०५-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी धरणाच्या सर्व्हिस गेटच्या अत्याधुनिकिकरणाच्या शासनाच्या विचाराधीन प्रस्तावावर निर्णय घेण्यात आलेला आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, धरणाचा पाणीसाठी आणि पूर नियंत्रणाच्या योजनेचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याची फलनिष्पत्ती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०९-२०२३) :** (१) होय,

कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी धरणाच्या सर्व्हिस गेटचा अत्याधुनिकिकरणाचा प्रस्ताव नियामक मंडळाच्या प्राधान्यक्रम यादीत समावेश करण्यासाठी महामंडळाच्या कार्यकारी समितीच्या दि.११/०४/२०२३ रोजीच्या १६८ व्या बैठकीत ठराव करण्यात आला आहे.

(२) व (३) राधानगरी धरणाचा पाणीसाठा नियंत्रीत करणेच्या व पूरनियंत्रणाच्या दृष्टीने धरणास वक्राकार दरवाजे बसविणे आणि सेवाद्वारांचे अत्याधुनिकीकरण करणे याबाबतच्या प्रस्तावाबाबत पुढील कार्यवाही केली आहे -

१) नियामक मंडळाच्या प्राधान्यक्रम यादीत समावेश करण्यासाठी महामंडळाच्या कार्यकारी समितीच्या दि.११/०४/२०२३ रोजीच्या १६८ व्या बैठकीत ठराव करण्यात आला आहे.

२) विशेष दुरूस्ती / विस्तार सुधारणेअंतर्गत प्रशासकीय मान्यतेबाबत छाननीसाठी प्रस्ताव महामंडळ कार्यालयाने दि.२०/०३/२०२३ रोजी राज्य तांत्रिक सल्लागार समिती क्र.२ पुणे कार्यालयास पाठविण्यात आले आहे.

(३) राधानगरी धरणाच्या सेवाद्वाराबाबतची जुनी व्यवस्था बदलून त्याठिकाणी सेवाद्वारांचे परिचलन सुकर करण्यासाठी धरणात सध्याच्या द्वारांमध्ये नलिका बसवून व्हॉल्व्ह पध्दतीचे दरवाजे D/S ला बसविणे यासाठी आवश्यक संकल्पन करून मिळणेबाबत संकल्पचित्र मंडळ, नाशिक यांना दि.२०/१०/२०२२ रोजीच्या पत्रान्वये क्षेत्रिय कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक येथील लाडची धरणासाठी संपादित करण्यात आलेल्या शेतजमिनीचा वाढीव मोबदला शेतकऱ्यांना देण्याबाबत**

**(३८) ६१५२० (२६-०४-२०२३). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील मे.दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे निकालानुसार एल.आर नं.५६२ ते ५६६/२०१० व ८७ ते ९२/२०१२ अन्वये लाडची धरणासाठी संपादित झालेल्या शेतकऱ्यांच्या शेतजमिनीची वाढीव नुकसान भरपाई शेतकऱ्यांना मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ५ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री महोदयांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०२३) :** (१) हे खरे नाही दि.०५/१२/२०२२ रोजीचे निवेदन प्राप्त नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आळंदी(ता.खेड, जि.पुणे) खंडोबा मंदिर येथील पोलीस ठाणे ते आळंदी ग्रामीण रुग्णालयाच्या परिसरात अतिक्रमणे झाल्याबाबत

**(३९) ६१५६० (०४-०५-२०२३). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आळंदी (ता.खेड, जि.पुणे) खंडोबा मंदिर येथील पोलीस ठाणे ते आळंदी ग्रामीण रुग्णालयाच्या परिसरात रस्त्यावर विक्रेत्यांनी हातगाड्या, ठेले, पथारीवाले, बेकायदा भाजी विक्रेते यांनी अतिक्रमण केल्यामुळे या परिसरात मोठी वाहतूक कोंडी होऊन नागरिकांना त्रास होत असल्याचे माहे जानेवारी २०२३ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, सदर चौकशीच्या अनुषंगाने अतिक्रमणे काढणेबाबत शासनाने कोणत्या स्वरूपाची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०९-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) आळंदी ग्रामीण रुग्णालयाच्या शेजारील नगरपरिषदेच्या मालकीच्या जागेत नगरपरिषद प्रशासनाकडून भाजीमंडई बसविण्यात आली आहे. तथापि, तेथील जागा अपुरी पडत असल्याने भाजीविक्रेते, हातगाड्यावाले आंबेडकर चौक ते खंडोबा मंदिर या रोडवर तसेच ग्रामीण रुग्णालयाच्या समोर तात्पुरत्या स्वरुपाची अतिक्रमणे करत होते.

(३) सदरची अतिक्रमणे हटविण्याकरीता आळंदी नगरपरिषेदमार्फत कारवाई करण्यात येत असून नगरपरिषदेच्या मागणीनुसार वेळोवेळी पोलीस बंदोबस्त पुरविण्यात आला आहे.

उपरोक्त ठिकाणी होणारी अतिक्रमणे आळंदी नगरपरिषद व आळंदी पोलीस स्टेशनमार्फत हटविण्यात आली असून सद्या कोणत्याही प्रकारची अतिक्रमणे नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गुहागर (जि. रत्नागिरी) येथे एका पोलीस कर्मचाऱ्याने हॉटेलमधील ग्राहकांशी केलेले गैरवर्तन

**(४०) ६१६५७ (२७-०४-२०२३). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील गुहागर शहरामध्ये एका पोलीस कर्मचाऱ्याने मदयपान करून हॉटेलमधील इतर ग्राहकांशी हुज्जत घालून हाणामारी केल्याची घटना दिनांक १७ जानेवारी २०२३ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेची तक्रार नोंदवून घेण्यात आली आहे काय, त्याअनुषंगाने सदर पोलीस कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०२३) :** (१) व (२) माहे फेब्रुवारी २०२३ मध्ये उपस्थित विधानसभा तारांकित प्रश्नाद्वारे सदर घटना निदर्शनास आली. या प्रकरणी उपविभागीय पोलीस अधिकारी, चिपळूण उपविभाग यांनी दि.२१.०२.२०२३ रोजी चौकशी केली. शृंगारतळी, ता.गुहाघर येथील हॉटेल "लगून" येथे दि.१३.०१.२०२३ रोजी रात्रौ १०.०० वा च्या सुमारास ४ व्यक्ती जेवणाकरीता आल्या होत्या. त्याचवेळी गुहाघर परिसात राहणारे मुले जेवणाकरीता आली होती. त्यांच्यात मोठ्या आवाजात शाब्दीक वाद झाला होता. त्यावेळी हॉटेल मेनेजर यांनी मध्यस्थी करुन त्यांच्यातील वाद मिटवला. किरकोळ भांडण झालेले असल्याने सदरबाबत कोणीही गुहाघर पोलीस ठाण्यात लेखी अथवा तोंडी तक्रार केलेली नाही. चौकशीमध्ये याप्रकरणी पोलीस कर्मचा-याने हॉटेलमधील ग्राहकांशी गैरवर्तन केल्याचे आढळून आलेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही

---

**मुंबई येथील दहिसर परिसरातील महिलेची फसवणूक होऊनही पोलीस गुन्हा दाखल करत नसल्याबाबत**

**(४१) ६१६८१ (२७-०४-२०२३). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीमती कमलाबाई भोईर रा. नागाव, पो. दहिसर, जि. ठाणे यांना ठाणे रजिस्टर कार्यालयमध्ये गुंडाने बळजबरीने नेऊन हाताचे ठसे घेतले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शिळडायघर पोलीस स्टेशन मध्ये तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शिळडायघर पोलीस स्टेशन मध्ये १४ जणांची नावे दिलेली असून तसा जबाब १ महिन्यापूर्वी नोंदवूनही अद्याप गुन्हा दाखल झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्याअनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०९-२०२३) :** (१) व (२) श्रीमती कमलाबाई भोईर यांनी दिनांक २१/१२/२०२२ रोजीच्या अर्जान्वये मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचेसह इतर कार्यालय व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, शिळ डायघर येथे याबाबतची तक्रार दिली आहे.

(३) श्रीमती भोईर यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने दि.२६/१२/२०२२ रोजी शिळ डायघर पोलीस स्टेशन येथे त्यांचा जबाब नोंदविला आहे.

गैरअर्जदार यांचेकडे चौकशी करण्याकरीता समजपत्र पाठविण्यात आले असून सदर प्रकरणी पुढील चौकशी सुरु आहे.

(४) याच विषयाच्या अनुषंगाने यापूर्वी श्रीमती भोईर यांचे विरोधात सलाउद्दीन इद्रीस खान यांनी मा.न्यायालयात अर्ज दाखल केला होता त्यावर मा. न्यायालयाने दि.२९/१०/२०२१ अन्वये सी.आर.पी.सी. कलम २०२ प्रमाणे अहवाल सादर करणेबाबत मुंब्रा पोलीस स्टेशनला आदेश दिले आहेत. सदर प्रकरणाची मुंब्रा पोलीस ठाणे, ठाणे शहर मार्फत चौकशी करून श्रीमती कमलाबाई वाल्मीक भोईर व इतर यांचेविरोधात मुंब्रा पोलीस ठाणे, ठाणे शहर यांनी दि. २२/०३/२०२२ रोजी चौकशीचा अहवाल मा. न्यायालयात सादर केला असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर शहरातील एम्स तसेच मेयो रुग्णालयात पोलीसांच्या नियुक्तीबाबत**

**(४२) ६१७६२ (०८-०५-२०२३). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील एम्स रुग्णालयात मेडिको लिगल केसेसची संख्या वाढली असुन वर्षभरात दीड हजार मेडिको लीगल केसेसच्या नोंदी झाल्या असतानाही याकरिता वेळेत पोलिस उपलब्ध होत नसल्याने संबंधितांना प्रचंड समस्यांचा सामना करावा लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय ,

(२) तसेच, मेयो मेडिकलमध्ये छोटेखानी पोलीस चौकी असुन तेथे एक पोलीस कर्तव्य सांभाळत असतो परंतू रुग्णालयात घडणा-या अनेक अपघाती रुग्णांची संख्या पाहता ही संख्या फारच कमी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एम्स तसेच मेयो रुग्णालयात येणा-या प्रामुख्याने अपघाती रुग्णांची संख्या व नातेवाईकांना होणारा प्रचंड मनस्ताप पाहता तेथे पोलीसांच्या नियुक्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०२३) :** (१) हे खरे नाही.

एम्स रुग्णालयाच्या आयपीडी विभागाजवळ पोलीस चौकी असुन तेथे २४ तासाकरीता तीन पोलीस अंमलदारांची नियुक्ती करण्यात आली आहे.

याबाबत संबंधीतांना प्रचंड समस्यांचा सामना करावा लागत असल्याबाबत तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) हे खरे नाही.

मेयो पोलीस चौकी हास्पिटलद्वारे उभारण्यात आली असुन, सदर चौकीत दिवसपाळी व रात्रपाळी करीता प्रत्येकी दोन याप्रमाणे पोलीस अंमलदार उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

मेडीकल हास्पिटल पोलीस ठाणे अजनीच्या हद्दीत येत असुन, दोन पोलीस अंमलदार दिवसपाळी व रात्रपाळी करीता उपलब्ध असतात.

(३) एम्स रुग्णालयात पोलीस स्टेशन सोनेगाव मधुन दिवसपाळी व रात्रपाळी करीता प्रत्येकी तीन याप्रमाणे पोलीस अंमलदारांची नियुक्ती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चेंबुर येथील माहुल गावातील शंकर देऊळ ते मैसूर कॉलनी रोड, बीपीसीएल रिफायनरी मुख्य गेट पर्यंत अनधिकृत पार्किंगबाबत

**(४३) ६१८५९ (०४-०५-२०२३). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चेंबुर येथील माहुल गावातील शंकर देऊळ ते मैसूर कॉलनी रोड, बीपीसीएल रिफायनरी मुख्य गेट पर्यंत मोठे अवजड भरलेले केमिकल टँकर्स, गॅस सिलेंडरचे मोठे ट्रक व मोठे डंपर्स रोडच्या दोन्ही बाजूला अनधिकृतपणे पार्किंग करण्यात येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अनधिकृत पार्किंगमुळे प्रवाश्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अनधिकृत पार्किंक प्रकरणी तेथील वाहतूक पोलिस व स्थानिक पोलिस यांनी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०९-२०२३) :** (१) माहुल परिसरामध्ये हिंदूस्थान पेट्रोलियम कार्पोरेशन, भारत पेट्रोलियम कार्पोरेशन व इतर कंपन्या असून सदर कंपन्यांमध्ये क्रुड ऑईलवर प्रक्रिया करून विविध रासायनिक पदार्थ तयार केले जातात. या पेट्रोलियम मालाची संपूर्ण भारतामध्ये वाहतूक करण्यासाठी दररोज सुमारे ४००० ते ५००० टँकर, ट्रक, ट्रेलर यांची माहुल परिसरात ये-जा सुरू असते.

सदरची वाहने पार्क करण्यासाठी वरील कंपन्यांमध्ये किंवा आजूबाजूस व्यवस्था करण्यात आलेली नसल्याने ती वाहने कंपनीच्या बाहेरील रस्त्यांवर वाहने पार्क करतात.

(२) हे खरे नाही.

(३) उपरोक्त ठिकाणी उभ्या असलेल्या व वाहतूकीस अडथळा करणाऱ्या वाहनांवर मोटार वाहन कायदा कलम १२२ अन्वये नो पार्किंगची कारवाई करण्यात आलेली असून सन २०२२ मध्ये १४०७३ व सन २०२३ मध्ये ४९१३ अवजड वाहनांवर ई-चलन मशीनद्वारे कारवाई केलेली आहे.

ट्राम्बे वाहतूक विभागाकडून वाशीनाका ते शंकर देऊळ येथे दररोज प्रथम सत्र व द्वितीय सत्राकरीता एकूण ०४ पोलीस अंमलदार तसेच गडकरी खाण रोड, बी.डी.पाटील मार्ग व आर.सी. मार्गावर ०१ पोलीस उप निरीक्षक व ०४ मोटार सायकल रायडर यांची नेमणूक करण्यात येते. सदर अधिकारी / अंमलदार यांना वाहतूकीस अडथळा करणाऱ्या वाहनांवर सतत परिणामकारक कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या असून सदर परिसरात वाहतूकीची कोंडी होणार नाही, याची दक्षता घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिके मध्ये स्मार्ट सिटीच्या धर्तीवर भुमीगत विदयुत वाहिण्याचे काम जलद गतीने होण्याबाबत**

**(४४) ६१९३९ (२७-०४-२०२३). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमध्ये स्मार्ट सिटीच्या धर्तीवर भुमीगत विद्युत वाहिण्याचे काम जलद गतीने होण्याबाबत व नविन मंजुर नसलेल्या भुमिगत विद्युत वाहीन्या मंजुर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणी संदर्भात शासनाने काय निर्णय घेतला आहे व त्यांचे स्वरूप काय आहेत ?

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०८-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) कल्याण- डोंबिवली महानगरपालिकेच्या क्षेत्रातील चिंचपाडा-काटेमानिवली शाखा, रेश्मा कॉलनी ते हनुमान मंदिर, चक्कीनाका ते मेट्रो मॉल, कोळशेवाडी, काटेमानेवली, तिसगाव, वालधूनी, कल्याण शिळरोड येथील उच्चदाब वाहिनी भुमिगत करण्याची कामे पुर्ण झाली आहेत. पत्रीपुलते दुर्गाडी चौक, बैजबाजार चौक ते छाया टॉकिज येथील उच्चदाब/लघुदाब वाहिन्याचे कामे प्रगतीपथावर असून टिटवाळा लिंक रोड, रौनक सिटी पासून गौरीपाडा-बी एसयुपी प्रकल्पापर्यंत कल्याण पश्चिम सॅमसॅग गॅलरी ते फोर्टीज हॉस्पिटल, वलीपीर रोड ते जी के चौक ते चिराग हॉटेल गोविंदवाडी रोड पर्यंतची कामे टप्प्याटप्प्याने करण्याचे नियोजित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संभाजीनगर (ता.कन्नड, जि.औरगाबांद) येथील नेवपूर मध्यम प्रकल्पाबाबत**

**(४५) ६२०६४ (२५-०४-२०२३). श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संभाजीनगर (ता.कन्नड, जि.औरगाबांद) येथील नेवपूर मध्यम प्रकल्पातील पाणी कालवा तयार करुन किंवा लिफ्टइरिगेशन करुन जामडी जहागीर मध्यम प्रकल्पात सोडण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी तत्कालिन जलसंपदा मंत्री, यांच्याकडे दिनांक १३ मार्च, २०२१ रोजीपासून वारंवार संबधित मंत्री व अधिका-यांकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) कन्नड तालुक्यातील नेवपूर मध्यम प्रकल्पातील पाणी कालवा तयार करून किंवा उपसा सिंचन योजनेद्वारे गणेशपूर लघु प्रकल्पात सोडण्याबाबत प्राथमिक सर्वेक्षण करण्याचे काम क्षेत्रीय स्तरावर प्रगती पथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कळवण (जि. नाशिक) तालुका येथील ओतुर ल. पा. योजना या धरणाचे विशेष दुरुस्तीच्या कामास सुप्रमा मिळण्याबाबत

**(४६) ६२२६६ (२४-०४-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळवण (जि. नाशिक) तालुका येथील ओतुर ल. पा. योजना या धरणाचे विशेष दुरुस्तीचे कामास सुप्रमा मिळणे कामी स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी तत्कालीन जलसंपदा मंत्री यांचेकडे दिनांक १८/१२/२०१९, ८/०१/२०२०, २८/०१/२०२० २२/, २२/०९/२०२० ०१/१०/२०२१ रोजी वा त्या सुमारास सातत्याने निवेदनाव्दारे विनंती केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने ओतुर प्रकल्प विशेष दुरुस्तीच्या कामासाठी सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पात रु. ४.०० कोटीची ठोक तरतुद देखील करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य तांत्रिक सल्लागार समिती नाशिक -१ यांच्या दि. ४/१२/२०२० रोजीच्या १५२ व्या बैठकीत ओतुर ल. पा. योजना ता. कळवण या प्रकल्पाच्या विशेष दुरुस्तीच्या कामाचा प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता छाननी अहवाल अंतिम टप्यात करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, ओतुर लपा योजनेस अद्याप सुप्रमा मिळाली नसल्याने स्थानिक शेतकरी यांना सिंचनापासुन वंचित रहावे लागत असल्याने याबाबत शासनाने चौकशी करुन ओतुर ल. पा. योजना विशेष दुरुस्ती प्रस्तावास सुप्रमा मिळणे कामी शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०९-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे. दि.०८/०१/२०२०,दि.२८/०१/२०२० व दि.२२/०९/२०२० रोजीच्या निवेदनांद्वारे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी विनंती केली आहे.

(२) नाही.

(३) होय.

राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक-१ यांच्या दि.०४/१२/२०२० रोजीच्या १५२ व्या बैठकीत ओतुर ल.पा. योजना ता. कळवण या प्रकल्पाच्या विशेष दुरुस्तीच्या कामाचा प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता अहवालावर चर्चा करण्यात आली.त्याअनुषंगाने आवश्यक सुधारणा करून महामंडळ कार्यालयाचे पत्र दि.२६/०७/२०२१ अन्वये रू. ४५.४५ कोटी रकमेचा सु.प्र.मा.अहवाल शासनास मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता.त्यावर शासनाने दि.०८/०४/२०२२ रोजीच्या पत्रान्वये मुद्दे उपस्थित केले आहेत.

दरम्यानच्या काळात राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या सूचनेनुसार सांडव्याचे संकल्पन मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचेकडून प्राप्त करून घेतले असून त्यानुसार सुप्रमा किंमतीमध्ये झालेल्या वाढीच्या अनुषंगाने सुप्रमा अहवाल पुनश्च राज्य तांत्रिक सल्लागार समितीकडे महामंडळाने दि.१६/०६/२०२२ अन्वये सादर केला आहे. त्याबाबत राज्य तांत्रिक सल्लागार समितीच्या १७३ व्या बैठकीत दि.१३/०७/२०२२ रोजी चर्चा झाली आहे.

यास्तव सद्यस्थितीत महामंडळ कार्यालयाचे पत्र दि.१२/०९/२०२२ अन्वये रू.४५.४५ कोटी रकमेच्या सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावास शासन स्तरावर तुर्त स्थगिती देणेबाबत शासनास कळविले आहे.

(४) दि.२५/०४/२०२३ रोजी मुख्य अभियंता (ज.सं). उत्तर महाराष्ट्र प्रदेश, नाशिक यांनी केलेल्या क्षेत्रिय परिस्थितीच्या पाहणीअंती मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक कडून प्राप्त संकल्पनास मान्यता देणेपूर्वी इतर पर्याय तपासून पाहणे आवश्यक असल्याचे निष्पन्न झाले असून त्यानुसार दि. २६/०४/२०२३ रोजी मुख्य अभियंता (जलसंपदा) उत्तर महाराष्ट्र प्रदेश, नाशिक यांनी अधीक्षक अभियंता (धरण), संकल्पचित्र मंडळ, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचेसमवेत सविस्तर चर्चा केली आहे.

या चर्चेच्या अनुषंगाने पर्यायांचे सविस्तर संकल्पन प्राप्त झालेनंतर यापूर्वी प्राप्त संकल्पने व आता नव्याने प्राप्त होणारी संकल्पने यातील उपलब्ध पर्यायातील सदर ठिकाणी योग्य अश्या संकल्पनास मान्यता देऊन अंदाजपत्रके तयार करणे,

सुधारीत प्रस्ताव रातांसस, नाशिक यांना सादर करणे, मान्यता प्राप्त झालेनंतर महामंडळ स्तरावरून प्रस्ताव शासनास सादर करणे इ. बाबतची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चोपडा मतदार संघातील (जि.जळगांव) जलसंपदा विभागांतर्गत प्रलंबित असलेल्या विविध प्रकल्पाबाबत**

**(४७) ६२४३१ (२५-०४-२०२३). श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चोपडा मतदार संघातील (जि.जळगांव) जलसंपदा विभागांतर्गत प्रलंबित असलेल्या १) निम्न तापी प्रकल्प, पाडळसे या प्रकल्पाचा प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत समावेश करणे, २) ल.पा.योजना हरिपूरा, व ल.पा.योजना, निम्बादेवी, ता.यावल प्रकल्पांचे काम पूर्ण करण्यासाठी आवश्यक निधीची तरतूद करणे, ३) हतनूर सिंचन प्रकल्पावरील उजवा कालवा किमी ५० ते ९२ मधील विशेष दुरुस्तीच्या कामाची अंदाजपत्रके मंजूर करणे, ४) शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ मिळणेसाठी गुळ मध्यम सिंचन प्रकल्पाची उंची वाढविणे व गुळ मध्यम सिंचन प्रकल्पात बांधित झालेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीच्या भूसंपादनासाठी तसेच सदर प्रकल्पाच्या बंदिस्त पाईप लाईनकरिता आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार मा.जलसंपदा मंत्री महोदयांकडे लेखी निवेदनाव्दारे व प्रत्यक्ष भेटून मागणी केलेली आहे तसेच दि.१७/०५/२०२२ व तद्नंतर वारंवार रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांकडेही लेखी निवेदनाव्दारे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने आतापर्यत कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०९-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) १) निम्न तापी प्रकल्प, पाडळसे, ता. अमळनेर, जि. जळगाव.

प्रकल्पाचा समावेश केंद्र शासन पुरस्कृत PMKSY-AIBP (२०२१-२६) या योजनेअंतर्गत करण्याच्या अनुषंगाने शासन पत्र दि.०७.१०.२०२१ अन्वये आवश्यक माहिती केंद्रीय जल आयोगाच्या नागपूर कार्यालयास सादर केली आहे. प्रकल्पास सुधारित प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे. सुधारित प्रशासकीय मान्यतेनंतर सदर प्रकल्प प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत (PMKSY) समावेश करणेबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे. सन २०२३-२४ मध्ये या प्रकल्पास रु.१०० कोटी इतक्या निधीची तरतुद करण्यात आली असून, बिनव्याजी कर्ज रु.२५ कोटी च्या प्रस्तावावर कार्यवाही करण्यात येत आहे.

२) लघु पाटबंधारे योजना हरीपुरा ता. यावल जि. जळगाव या प्रकल्पाचा पाणीसाठा ५.९९८ द.ल.घ.मी. असून, सिंचन क्षेत्र ५६४ हेक्टर आहे. प्रकल्पासाठी अवशिष्ठ प्रकल्पांतर्गत सन २०२३-२४ साठी रु.२.५० कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे.

लघु पाटबंधारे योजना निंबादेवी ता. यावल जि. जळगाव या प्रकल्पाचा पाणीसाठा २.४२८ द.ल.घ.मी. असून, सिंचन क्षेत्र ३०६ हेक्टर आहे. प्रकल्पासाठी अवशिष्ठ प्रकल्पांतर्गत सन २०२३-२४ साठी रु.०.४० कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे.

३) हतनुर उजवा कालवा कि. मी. ५० ते ९२ मधील दुरुस्तीचे करणेचे कामास विशेष दुरुस्ती अंतर्गत प्रशासकीय मान्यतेकरिता

सन २०२३-२४ च्या महामंडळाच्या वार्षिक आखणीत देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी रु. १०३ कोटी इतकी तरतूद आहे. दुरुस्तीच्या कामांना प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी सुधारीत प्रस्ताव सादर करणेची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे.

४) गुळ मध्यम प्रकल्प:-

प्रकल्पाच्या उंची वाढीची कार्यवाही पूर्ण झालेली आहे. प्रकल्पाच्या पूर्ण संचय पातळीत २६७.१५मी वरून २६८.४५ मी

ने वाढ करून १९.६९ द.ल.घ.मी. ऐवजी २३.२५ द.ल.घ.मी. पाणीसाठा निर्माण करण्यात आला. त्यामुळे २६३७ हे सिंचन क्षमता वरुन ३०२५ हे सिंचन क्षमता करण्यात आली आहे. त्यामुळे सदयस्थितीत पर्जन्यमानाच्या अभ्यासानुसार उंची वाढ करणे शक्य नाही. तसेच प्रकल्पाच्या भूसंपादनाकरीता रक्कम रू.२४.४० कोटी निधी पैकी रु.३.४२ कोटी वितरित केली आहे व उर्वरित निधी उपलब्धतेनुसार वितरित करण्यात येणार आहे. तसेच बंदिस्त पाईपलाईनचे कामाचा समावेश प्रकल्पाच्या पाचव्या सुप्रमा अहवालात केला असून, सदरच्या प्रस्तावास राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांची मान्यता घेण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## टुकुर (खांडे पारगांव) (ता.जि. बीड ) येथील मंजूर झालेल्या साठवण तलावाऐवजी त्याठिकाणी निम्नस्तर पातळी बंधारे बांधण्याबाबत

**(४८) ६२६९० (२५-०४-२०२३). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) टुकुर (खांडे पारगांव) (ता.जि. बीड) येथील साठवण तलावाचे कामास सन २००४ मध्ये शासनाने मंजुरी देऊन सदर कामाचे कार्यारंभ आदेश देखील शासनाने दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मंत्रालयात जलसंपदा मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १८ मे, २०२२ रोजी झालेल्या बैठकीत टुकूर साठवण तलावाऐवजी त्या परिसरात ९ निम्नस्तर पातळी बंधारे बांधण्याचा निर्णय घेण्यात आला होता, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बैठकीत टुकूर साठवण तलावांऐवजी ९ निम्नस्तर पातळी बंधारे बांधण्यासंदर्भात निर्णय होऊन ८ ते ९ महिन्यांचा कालावधी झालेला असतांना सदर निर्णयाप्रकरणी अद्याप कार्यवाही झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निम्नस्तर पातळीचे बंधारे बाधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे. या योजनेस शासन निर्णय दि. १९/०५/२००३ अन्वये शासन स्तरावरुन प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आलेली असून कार्यारंभ आदेश क्षेत्रिय स्तरावरुन देण्यात आले आहे.
(२) होय, दि.२१/०३/२०२२ रोजी आयोजित नियामक मंडळाच्या ७९ व्या बैठकीतील ठरावाप्रमाणे टुकूर (खांडेपारगाव) साठवण तलाव ता. जि. बीड या योजनेमध्ये धरणस्थळी प्रकल्पाची उंची कमी करुन धरणाच्या ठिकाणी एक व त्याच्या वरील व खालील बाजुस दोन ते तीन निम्न पातळी बंधारे यांचा समावेश करून या योजनेचे फेर नियोजन व सर्वेक्षण इत्यादी करून अद्यावत सुधारीत प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रक तयार करुन सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात आली होती.
(३) महामंडळ कार्यालयाचे पत्र दिनांक ०३/०२/२०२३ अन्वये प्राप्त टुकूर (खांडेपारगांव) (ता.जि.बीड) या प्रकल्पाच्या फेरनियोजन प्रस्तावाच्या अनुषंगाने मंजुरी बाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(४) कार्यवाही प्रगत असल्याने प्रश्न उदभवत नाही.
(५) प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे.

---

## बुलढाणा जिल्ह्यातील शिंदखेडा राजा येथे जिजाऊ जन्मोत्सवासाठी आलेल्या भक्तांची झालेली गैरसोय

**(४९) ६२७८६ (३०-०४-२०२३). श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील शिंदखेडा राजा येथे जिजाऊ जन्मोत्सवासाठी येणाऱ्या भाविक भक्तांची स्थानिक पोलीस प्रशासनाच्या आडमुठ्या धोरणामुळे गैरसोय झाल्याची बाब दिनांक १४ जानेवारी २०२३, रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुमारे २८ वर्षापासून स्थानिक जिल्हा प्रशासन, पोलीस यंत्रणा व मराठा सेवा संघ यांच्या समन्वयाने योग्य नियोजन करून हा सोहळा आतापर्यंत कोणत्याही प्रकारचे गालबोट न लागतात पार पडत आला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास,यावर्षी स्थानिक पोलीस प्रशासनाचे जिल्हा पोलीस उपअधिक्षक श्री. यमावार यांनी जिजाऊ सृष्टीकडे जाणाऱ्या मार्गांमध्ये ऐनवेळी बदल केल्यामुळे व महोत्सवास येणारी वाहने ७ ते ८ किलोमीटर दूरवर अडविल्यामुळे भक्तांना नाहक पायपीट करावी लागली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०९-२०२३) :** (१) नाही.

(२) होय, बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा येथे जिजाऊ जन्मोत्सव सोहळा हा दरवर्षी स्थानिक जिल्हा पोलीस यंत्रणा, मराठा सेवा संघ यांच्या समन्वयाने योग्य नियोजन करुन आतापर्यंत कोणत्याही प्रकारचे गालबोट न लागता पार पडत आला आहे.

(३) व (४) सदर महोत्सवासाठी दरवर्षी अंदाजे तीन लाख भाविक दिवसभरात दर्शन घेण्यासाठी येतात. सदर उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी दरवर्षी जिल्हा पोलीस यंत्रणेकडून या दरम्यान बंदोबस्ताचे नियोजन केले जाते. यावर्षी आयोजकांकडून केवळ एकाच ठिकाणी जिजाऊ सृष्टीला लागून उत्तर बाजूस पार्कीगची व्यवस्था केली होती. ज्या ठिकाणी केवळ २००० चारचाकी वाहने पार्कीग करु शकत होते. दरवर्षी प्रमाणे येणारी साधारण २० हजार ते २५ हजार दुचाकी व चारचाकी वाहनांची संख्या लक्षात घेता त्या परिसरात ११ ठिकाणी पार्कीगची व्यवस्था व बंदोबस्त करण्यात आला होता. तसेच सदर उत्सवामध्ये चेंगराचेंगरीच्या घटना घडू नये याबाबत पोलीसांकडून योग्य ते नियोजन करण्यात आले होते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कामठी (जि. नागपूर) तालुक्यांत राजरोसपणे बेकायदेशीर धंदे मोठया प्रमाणात सुरू असल्याबाबत

**(५०) ६४३४५ (१४-०६-२०२३). श्री.टेकचंद सावरकर (कामठी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नविन कामठी व जुनी कामठी पोलीस स्थानकांअंतर्गत मोठ्या प्रमाणात जुगार अड्डे, अवैध दारू विक्री, गांजा, एमडी विक्री सुरू असल्याबाबत दिनांक १८ फेब्रवारी २०२३ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, या बेकायदेशीर व अवैध धंद्याबाबत तेथील पोलीस स्टेशनला नागरिकांनी वारंवार तक्रारी करुनही पोलीस अधिकाऱ्यांकडून कारवाई करण्याऐवजी एकप्रकारे अवैधधंद्याना संरक्षण देत असल्यामुळे नागरिकांमध्ये असंतोषाची भावना निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार अवैधधंद्यांना संरक्षण देणाऱ्या संबंधित पोलिसांविरुध्द तसेंच अवैधधंदे करणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली अथवा करण्यांत येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०२३) :**(१) हे अंशत: खरे आहे.

नागपूर शहर पोलीस आयुक्तालयाअंर्तगत जुगार अड्डे, अवैध दारू विक्री, गांजा, एमडी बाबत पोलीस ठाणे, नविन कामठी येथे दि. १८ फेब्रुवारी, २०२३ रोजी एकही गुन्हा दाखल नाही.

याबाबत, पोलीस ठाणे, जुनी कामठी येथे दि. १८ फेब्रुवारी, २०२३ रोजी एक गुन्हा दाखल असून महाराष्ट्र जुगार कायदा, कलम १२ अन्वये अप.क्रं. ३७/२०२३ गुन्हा दाखल करण्यात आला आहे, प्रकरणी तीन आरोपी अटक करण्यात आले असून त्यांच्याकडून रू. ५१५७०/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

बेकायदेशीर व अवैध धंद्याबाबत संबंधीत पोलीस स्टेशनला नागरिकांकडून तक्रार प्राप्त झाल्यानंतर पोलीसांकडून तात्काळ त्यावर कारवाई केली जाते. सबब, अवैध धंद्यांना पोलीसांकडून संरक्षण दिले जात असल्याची बाब निदर्शनास आली नसल्याने प्रकरणी संबंधीत पोलीसांविरुद्ध कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.